
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

वर्ष सत्ताविसावे / अंक ८ / ऑगस्ट २०२६



## संपादकीय

## आयएसीएसची दीडशे वर्षे

इंडियन असोसिएशन फॉर दी कल्टिवेशन ऑफ सायन्स (Indian Association for the Cultivation of Science) या नावाची एक संस्था कलकत्ता शहरात आहे. या संस्थेचा संक्षिप्त स्वरूपात आयएसीएस (IACS) असा उल्लेख करतात. कलकत्ता शहरातील जादवपूर विद्यापीठाजवळ या संस्थेची सुबक इमारत आहे. २९ जुलै १८७६ रोजी या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेला या वर्षी दीडशे वर्षेपूर्ण झाली. मागील दीडशे वर्षांत या संस्थेने भारतीय विज्ञानाच्या प्रगतीत मोलाची भूमिका बजावली आहे.

१९५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी भारतावर आपली पकड आणखी मजबूत करण्याचा प्रयत्न केला. ब्रिटिश शिक्षण पद्धतीचा ते प्रचार करू लागले. मुंबई, मद्रास, कलकत्ता या शहरात त्यांनी विद्यापीठे स्थापन केली. असे जरी असले तरी भारतीय संशोधकांना संशोधन करण्याची सुविधा त्यांनी निर्माण केली नाही. भारतीय तरुण संशोधन करण्यास सक्षम आहेत, त्यांना जर संधी मिळाली तर ते मूलभूत संशोधन करू शकतील असा विश्वास बाळगणारे काही विचारवंत आपल्या देशात होते. त्यासाठी संशोधनाला वाहिलेली संघटना स्थापन करण्याची गरज त्यांना वाटली. या विचाराला प्रत्यक्षात आणण्यासाठी डॉ. महिंद्रलाल सरकार पुढे सरसावले. ते काही समविचारी लोकांना एकत्र आणून आणि त्यांच्याकडून आर्थिक मदत घेऊन त्यांनी विज्ञान वर्धनासाठी या संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. लंडनच्या रॉयल सोसायटी सारखी ही संस्था असावी असे त्यांचे स्वप्न होते. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, आशुतोष मुखर्जी, केशव चंद्र सेन अशा मातब्बर व्यक्तींनी त्यांना पाठबळ दिले.

सुरुवातीच्या काळात ही संस्था म्हणजे समविचारी लोकांना एकत्र आणण्याचे व्यासपीठ होते. आचार्य प्रफुल्ल चंद्र रे, जगदीश चंद्र बोस यांच्या सारखे नावाजलेले शास्त्रज्ञ या संस्थेच्या स्थापनेनंतर लगेच तिच्याशी जोडले गेले. हळूहळू संशोधकांचा गोतावळा वाढत गेला. त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी या संस्थेत प्रयोगशाळा उभारण्यात आली. १९०७ मध्ये चंद्रशेखर वेंकट रमन कलकत्त्याला आले. ते खरे तर सरकारी नोकरीत होते. परंतु विज्ञानाची त्यांना आवड असल्यामुळे ते या संस्थेकडे आकर्षित झाले. सुरुवातीच्या काळात आपले कार्यालयातील काम संपले की ते इथे येत असत. त्यांनी १९१७ मध्ये सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन पूर्णवेळ अध्ययन, अध्यापन आणि संशोधन करण्याचा

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)


निर्णय घेतला. रामन परिणाम म्हणून प्रसिद्ध झालेले त्यांचे संशोधन याच संस्थेत करण्यात आले. या संस्थेच्या प्रवेशद्वारावर एक फलक लावला आहे. त्यावर, '२८ फेब्रुवारी १९२८ रोजी रामन परिणामाचा शोध इथे लावण्यात आला' असे नमूद केले आहे. रामन यांना त्यांच्या संशोधनासाठी १९३० चे नोबेल पारितोषिक देण्यात आले. या पारितोषिकाची प्रतिकृती देखील या संस्थेच्या प्रवेशद्वारावर ठेवलेली आहे.

आयएसीएस या संस्थेने अनेक संशोधकांना मदतीचा हात दिला. त्यातील एक होते सत्येंद्रनाथ बोस. त्यांचे कार्य सैद्धांतिक स्वरूपाचे होते. क्वांटम मेकॅनिकस् या क्षेत्रात त्यांनी बहुमोल असे काम केले आहे. त्या वेळचे नावाजलेले शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या सहकार्याने त्यांनी कणांच्या गति संबंधात मूलभूत अशी समीकरणे तयार केली. आपल्या गणितासाठी त्यांनी काही विशिष्ट कणांची कल्पना केली. त्या कणांना बोसॉन म्हणून संबोधण्यात यावे असे जर्मन भौतिकशास्त्रज्ञ पॉल डिरॅक यांनी सुचवले. तेच नाव नंतर रूढ झाले. असे जरी असले तरी बोस यांनी कल्पिलेले कण प्रत्यक्षात उपलब्ध नव्हते. पुढे ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ पिटर हिग्ज यांनी त्यांची कल्पना उचलून धरली आणि अशा प्रकारचे कण अस्तित्वात असलेच पाहिजे असे आग्रही मत मांडले. त्यांचे मत तपासण्यासाठी जिनिव्हा येथील सर्न प्रयोगशाळेत विशेष प्रयोग करण्यात आले. त्या प्रयोगात त्यांना २०१६ मध्ये यश आले आणि बोस यांनी कल्पिलेले कण अस्तित्वात असतात हे सिद्ध झाले. ही घटना व यश अनुभवण्यासाठी एस. एन. बोस मात्र जीवंत नव्हते. ४ फेब्रुवारी १९७४ रोजी त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली होती.

आयसीएसशी संबंधित असलेले आणखी एक शास्त्रज्ञ म्हणजे मेघनाद सहा. त्यांनी खगोलशास्त्रात मोलाची भर घातली. ताऱ्यांच्या वर्णपटांचे स्पष्टीकरण देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या संशोधनामुळे खगोल भौतिकीच्या विकासाला चालना मिळाली. भौतिकशास्त्राच्या क्षेत्रात त्यांचे नाव मानाने घेतले जाते. वर उल्लेखिलेल्या शास्त्रज्ञाखेरीज अनेक भारतीय शास्त्रज्ञांनी या संस्थेचा उपयोग करून घेतला. केदारनाथ बॅनर्जी यांनी क्ष किरण स्फटिकशास्त्रातील आपले मोलाचे संशोधन याच संस्थेत केले. त्याचबरोबर ज्ञानचंद्र घोष, अजय घटक, दिलीप कुमार रॉय, शंकर कुमार पॉल या शास्त्रज्ञांनी या संस्थेची व्याप्ती आणखी वाढविली. त्यामुळे आयएसीएस ही संस्था आशिया खंडातील एक अग्रगण्य संशोधन संस्था म्हणून नावारूपाला आली.

वर सांगितल्याप्रमाणे पारतंत्र्याच्या काळात देशात वैज्ञानिक वातावरण निर्मिती करण्यासाठी या संस्थेची स्थापना करण्यात आली. ते कार्य या संस्थेने चोख बजावले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील संस्थेचे कार्य अव्याहतपणे सुरू आहे. लहानशा जागेत सुरू झालेली संस्था आता मोठ्या इमारतीत स्थलांतरित झाली आहे. संस्थेचा चांगला विस्तार झाला असून, विविध विषयांत संशोधन करण्याच्या सुविधा इथे उपलब्ध आहेत. भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या आधिपत्याखाली ही संस्था अभिमत विद्यापीठ म्हणून कार्यरत आहे. येथे बी. एस. आणि एम. एस. या पदव्या प्राप्त करण्यासाठी अध्यापन केले जाते. त्यासाठी या संस्थेने आयोजित केलेली परीक्षा द्यावी लागते. त्याचबरोबर विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये संशोधन करायची संधी ही संस्था पुरविते. या सुविधांचा तरुण संशोधकांनी उपयोग करून घ्यावा असे आवाहन मी करू इच्छितो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**




व्ही.पी.एम्.

# दिशा

## वर्ष सत्ताविसावे/अंक ८/ऑगस्ट २०२६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३१ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : ९१५२४८७७६५**
**Email:perfectprints@gmail.com**


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | जागतिक वारसा स्थळ : नामांकित गड किल्ल्यांचा परिचय - किल्ले खांदेरी | दिलीप नारायण वंडलकर | २ |
| ३) | गंधसंवेदन | नरेंद्र गोळे | ८ |
| ४) | मराठी साहित्यातील शांत समाधी : 'डोह'कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १० |
| ५) | परिसर वार्ता | संकलित | १२ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय
# किल्ले खांदेरी

*व्यापारासाठी भारतात आलेले पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच हे परकीय लोक पुढे आपल्या सागरी किनाऱ्यावर मालकी हक्क सांगू लागले, किनाऱ्यावर किल्ले बांधून राहू लागले. या व्यापाऱ्यांपैकी इंग्रज हे कमालीचे धूर्त व लबाड होते. मुघल, आदिल, निजाम यांनी जरी त्यांच्याकडे कानाडोळा केला असला तरी छत्रपती शिवाजीमहाराजांनी त्यांच्यावर कायमच नजर ठेवली. मुंबई हे त्यांचे मुख्य व्यापारी केंद्र असल्याने त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी मुंबईजवळ खांदेरी हा जलदुर्ग अत्यंत विपरित स्थितीत अवघ्या सहा महिन्यांत बांधून काढला. शिवबाराजेंच्या हयातीत त्यांनी बांधलेला हा शेवटचा किल्ला होता. त्याचीच माहिती या लेखात दिलेली आहे. – संपादक*




## खांदेरी किल्ला

राजांना जंजिऱ्याच्या बातम्या कळत होत्या. इंग्रजांचे मुंबईला वाढणारे महत्त्व जाणवत होते. राजांनी आजवर सिद्दीचा पराभव करण्याचे अखंड प्रयत्न चालू ठेवले होते, पण सिद्दीचा पराभव होत नव्हता. सिद्दीला इंग्रज मुंबईहून सहाय्य करीत होते. या मदतीमुळे राजांचे स्वप्न पूर्ण होत नव्हते. शिवबांनी मुंबईचा व जंजिऱ्याचा हा संबंध तोडण्याचे ठरवले. शिवाजी महाराजांचे लोक १६७२ पासून खांदेरीवर ये जा करीत होते. मात्र त्यांनी मुंबईवर नियंत्रण ठेवण्यासाठी सन १६७९ मध्ये ऐन पावसाळ्यात खांदेरीवर दुर्ग बांधण्याचे निश्चित केले. पावसाळ्यात सिद्दीने आपले आरमार मुंबई बंदरात नांगरण्याऐवजी सुरत बंदरात नांगरले होते. त्याचाच फायदा घेण्यासाठी महाराजांनी पावसाळा निवडला. हा बेत त्यांनी इतक्या त्वरेने व गुप्ततेने अंमलात आणला की त्याची दखल घेतली जाण्यापूर्वी अनेक ठिकाणी छातीइतक्या भिंती आपल्या माणसांच्या रक्षणार्थ बांधून घेतल्या आणि कांही लहान तोफाही बसवून घेतल्या. खांदेरी हे बेट मुंबईपासून २० कि.मी. दक्षिणेस, तर मुख्य भूमीपासून ४ कि.मी. पश्चिमेस आहे. याच्या जवळच पूर्वेकडे उंदेरी हे बेट सुमारे २ कि.मी. अंतरावर आहे. खांदेरी बेटावर दोन टेकड्या असून, जहाजे नांगरण्यासाठी उत्तरेकडील स्थान सुरक्षित आहे.

ऑगस्ट १६७९ च्या अखेर मराठा आरमार अधिकारी मायनाक भंडारी दीडशे लोक आणि चार छोट्यातोफा घेऊन खांदेरीवर आला. मराठ्यांनी हे बेट काबीज केल्याचे पाहून इंग्रजांनी मराठ्यांना हे बेट सोडून जाण्यास सांगितले. तेंव्हा मायनाकने शिवाजीमहाराजांच्या आज्ञेशिवाय आपल्याला बेट सोडून जाता येत नाही, असे इंग्रजांना कळविले. त्यामुळे मायनाक भंडारीचे थळच्या किनाऱ्याशी चाललेले दळणवळण तोडण्याकरता इंग्रजांनी एक्साईन ह्यूझ याच्या नेतृत्वाखाली तीन शिबाडांचे एक पथक पाठवले. हे पथक ४ सप्टेंबरच्या सकाळी खांदेरीवर पोहचले. तोवर मराठ्यांनी चारशे किंवा अधिक माणसे बेटावर उतरवली होती व बेटावर छोटी छोटी खोपटी उभारली होती. बेटावर उतरण्याकरिता सोईस्कर जागांवर दगडमातीचे तीन फूट उंचीचे आडोसे बांधले होते आणि चार-सहा तोफा मोर्चे बांधून लावल्या

आपल्याकडे जे आहे त्यात समाधान मानून जे नाही त्यासाठी प्रयत्नशील राहणे यातच खरे शहाणपण आहे.
– श्री प्रल्हाद वामनराव पै

होत्या. इंग्रज नाविक पथक येऊन पोहोचल्यावर दोन तासांनी माणसांनी भरलेल्या दोन होड्या मुख्य भूमीकडे आल्या, पण इंग्रजांनी त्यांना अडवून परत पाठविले. त्यापुढील दहा दिवस मराठ्यांनी खांदेरीला पुरवठा करण्याचा उद्योग थांबवला. पण, बेटावर तटबंदी बांधण्याचे काम चालूच राहिले आणि नऊ सप्टेंबर १६७९ पावेतो मराठ्यांनी कांही तोफगाडेही तयार केले होते. १३ सप्टेंबर १६७९ रोजी 'रिव्हेंज' ही सोळा तोफांची फ्रिगेट सैनिकांच्या दोन तुकडीसह संध्याकाळी मुंबईहून निघाली आणि रात्री नऊ वाजता खांदेरीपाशी येऊन पोहोचली. कॅप्टन विल्यम मिंचीन हा तिचा कर्णधार होता. दुसऱ्या दिवशी हवामान खराब असल्यामुळे तीनही शिबाडे मुंबईला परतली. एकट्या रिव्हेंजने नाकेबंदी चालू ठेवली.

१७ किंवा १८ सप्टेंबर १६७९ रोजी तीन शिबाडांचे पथक रिव्हेंजला सामील झाले. ह्यूज आजारी असल्यामुळे त्या पथकाचे नेतृत्व फ्रान्सिस थॉर्प याच्याकडे होते. थॉर्पने शिबाडांवरून तोफा उडवल्या व बेटावर उतरण्याचा प्रयत्न केला. थॉर्पच्या तोफांना बेटावरून प्रत्युत्तर देण्यात आले. या झटापटीत थॉर्प ज्या शिबाडावर होता, ते इंग्रजांनी गमावले आणि इतर दोन परत आली. थॉर्प व त्याचे साथीदार ब्रॅडबरी आणि वेल्च ठार झाले, तर इतर अनेकांना मराठ्यांनी कैद केले. आता फक्त रिव्हेंज व एक शिबाड या भरवशावर इंग्रजांची नाकाबंदी सुरू होती. ती आणखी सुदृढ करण्यासाठी इंग्रजांचे नाविक पथक कॅप्टन रिचर्ड केव्हीन याच्या नेतृत्वाखाली आणखी दोन गुराबा, तीन शिबाडे, दोन माचवे आणि १८८ सैनिकांसह ७ ऑक्टोबर १६७९ रोजी निघाले. नाकेबंदी वाढली पण किल्ला उभारणीच्या वेगाने सुरू असलेल्या कामात अडथळा येणार नाही याची दक्षता मायनाकने घेतली होती. पुढे मराठा आरमार सेनाप्रमुख दौलतखानाच्या आधिपत्याखाली गलबते आणि गुराबा मिळून सुमारे ३५ नौकांचे मराठ्यांचे आरमार थळच्या बंदरात दाखल झाले. मराठ्यांच्या नौकांशी सामना करण्यासाठी इंग्रजांच्या नौका एकत्र आल्या. त्यामुळे खांदेरीची नाकेबंदी ढिली पडली. या स्थितीचा फायदा घेऊन चपळ मराठ्यांनी होड्यांनी सामान व माणसांचा पुरवठा अधिक वेगाने सुरू ठेवला.

१८ ऑक्टोबर १६७९ ला मराठ्यांच्या ताफ्याने अनपेक्षित झडप घातली. मराठ्यांनी वाऱ्याचा आधार घेतला, वल्ह्यांना जोर दिला आणि अचानक वेग वाढवित तोफांचा वर्षाव केला; इंग्रजांना नांगर काढण्याची किंवा तोफा वळवण्याचीसुद्धा मुभा मिळाली नाही. परिणामी इंग्रजांची जहाजे दक्षिणेकडे अस्ताव्यस्त पळू लागली. त्यातच डव्ह नांवाची गुराब मराठ्यांच्या वेढ्यात अडकली. डव्हचा कमांडर मौलिव्हर याने रिव्हेंजला साहाय्याची हाक दिली; परंतु उथळ पाण्यामुळे रिव्हेंज हलू शकत नव्हती. पंधरा मिनिटांच्या असहाय्य प्रतिकारानंतर डव्हने ध्वज खाली केला. डव्हच्या तोफा मराठ्यांनी खांदेरीच्या बचावासाठी उतरविल्या. मात्र कैद केलेल्या इंग्रजांशी योग्य वर्तन केले. या लढतीचा गडगडाट मुंबईतही ऐकू गेला. मराठा सैन्य जमिनीवर जमल्याने मुंबईला तातडीचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे इंग्रज ताफ्याला मजबूत करण्यासाठी 'फॉर्चून' हे बाँबफेकी जहाज, दोन शिबाडे आणि नवे सैनिक भरती करून ताफा दहा जहाजांपर्यंत वाढविण्यात आला. मात्र, मराठ्यांच्या चपळाईपुढे इंग्रज कॅप्टन केव्हीन हतबल ठरत होता. त्यामुळे मराठ्यांना सापळ्यात पकडण्याचे त्याने नवे धोरण आखले. २६।२७ ऑक्टोबर १६७९ च्या रात्री केव्हीनने नागावच्या नदीमुखापाशी शिबाडांनी घाव घातला; परंतु मराठा बोटी उत्तरेस वळल्याने तो निष्फळ ठरला. दुसऱ्या दिवशी त्याच बोटी दक्षिणेकडून येऊन सहजपणे नागाव नदीत शिरल्या. ३० ऑक्टोबर १६७९ ला इंग्रजांची 'हेक्टर' ही गुराब अनुपयुक्त ठरल्याने इंग्रजांचा प्रतिकार कमजोर झाला आणि मराठे खांदेरीला पुरवठा करीतच राहिले.

---

भेट आणि संवाद गरजेचा. एखादी भेट बऱ्याच गैरसमजांची गाठ सोडवते आणि
एखादा संवाद अनेक वाद मिटवतो !

अशातच सिद्दीने इंग्रजांविरुद्ध उचल खाल्ली. आता मात्र इंग्रजांनी तडजोडीचा मार्ग स्वीकारला. शिवबाराजेंनाही युद्ध नको असल्याने, त्यांनी इंग्रजांना एक सौजन्यपूर्ण पत्र पाठवले, जे त्यांच्या शांतताप्रिय भूमिकेचे लक्षण मानले गेले. इंग्रजांतर्फे ३१ ऑक्टोबर १६७९ ला त्याप्रमाणे शिवाजीमहाराजांना सुसंस्कृत उत्तर पाठविण्यात आले. त्यात, 'मानाने आणि योग्यवेळी महाराजांकडून सुटका करून घ्यावी, परंतु ती माघार वाटू नये; ती मैत्रीची कृती भासली पाहिजे, थोडक्यात तहाने नव्हे तर योजनेने परत हटावे आणि असे करतांना राजांच्या खांदेरीवरील हक्कास पुष्टी मिळेल', असा त्या पत्रातील मजकूर होता. पत्राचार सुरूच होता. इंग्रजांनी खांदेरीची नाकेबंदी सुरूच ठेवली. ६ नोव्हेंबर १६७९ च्या संध्याकाळी केव्हीनने संपूर्ण ताफ्यासह नागाव नदीच्या मुखाशी तळ ठोकला. मात्र, १० नोव्हेंबरला त्याला पूर्वीच्या खांदेरीसमोरील ठिकाणी परतावे, असा मुंबई कौन्सिलकडून आदेश आला. याला कारणही तसेच जबर होते. त्याचदिवशी दोन मोठी जहाजे, पाच फ्रिगेट्स, एक केच, सव्वीस गॅलिओट्स आणि सातशे सैनिक असा सिद्दीचा ताफा मुंबईजवळ दिसला. यावेळी खांदेरीवर मराठ्यांचे फक्त तीनशे सैनिक आणि दोनशे मजूर हजर होते. मराठे आणि इंग्रज यामध्ये दीर्घकाळ तोफांची देवाणघेवाण सुरू राहिली. परंतु मराठे अविचल राहिले. २७ नोव्हेंबरला मोरोपंतांच्या इंग्रजांना आलेल्या पत्रात 'बेट सोडण्यास ठाम नकार असल्याचा' मजकूर होता. तो पूर्णपणे इंग्रज कौन्सिलच्या अपेक्षेविरुद्ध होता. त्याचवेळेस दौलतखानाने मुंबईला शिवाजीमहाराजांचे सौजन्यपूर्ण पण ठाम पत्र पाठवले – त्यामधून खांदेरी बांधणीचा निर्धार स्पष्ट दिसत होता. १७ डिसेंबर १६७९ ला कॅप्टन डर्टनने केव्हीनची जागा घेतली. त्यानंतर इंग्रजांच्या नाकेबंदी तुकडीचे नेतृत्व अधिक शिस्तबद्ध झाले, तरी परिस्थितीचा मूलस्वरूप ताण मात्र पूर्ववतच राहिला. शत्रूच्या अखंड माऱ्यानं मराठ्यांच्या किल्ले बांधणीचा वेग न कमी झाला, न ढळला; उलट जिद्दीने ते कार्य सुरूच राहिले.

या संपूर्ण संघर्षांत अजून एक निर्णायक टप्पा आला. ९ जानेवारी १६८० रोजी सिद्दीने बाजूच्या उंदेरीवर माणसे उतरवून किल्ला बांधणीस प्रारंभ केला. आता इंग्रज, मुघल आणि मराठे – या सर्व शक्तींच्या महत्त्वाकांक्षा खांदेरीवर एकत्र झाल्या. १२/१३ जानेवारीच्या रात्री मराठा आरमाराने नागावमधून निघून उंदेरीवर केलेला झंझावाती हल्ला जणू काळोख्या सागरावर वीज चमकावी, असा होता. १९ जानेवारीच्या रात्री मराठ्यांनी इंग्रजांना पुन्हा चकविले. दोन गॅलिओट्सनी पहारेकऱ्यांची दिशाभूल केली; परंतु इंग्रजांची जागरुकता आणि ठराविक नियमांमुळे हा डाव अखेर उघड झाला. तोफांचे अनेक मारे झाले तरी मराठी नौका विजेच्या चमकाराप्रमाणे अदृष्य झाल्या. २६ जानेवारी १६८० ची पहाट मात्र रोमहर्षक ठरली. सिद्दीने ३००० हजार सैनिक आणि दहा मोठ्या तोफा उभ्या केल्या होत्या. त्याला शह देण्यासाठी दौलतखानाचा ताफा नागाव नदीतून बाहेर येऊन तीन बाजूंनी उंदेरीवर धडकला. तोफांचा दणदणाट, समुद्रातील दिशाहीन तरंग आणि बुडत्या जहाजांबरोबर वाहत येणारे मृतदेह – या सर्वांनी त्या दिवशीचा इतिहास जणू लालेलाल करून रंगविला. खांदेरी–उंदेरीचा हा सागरी संग्राम फक्त बेटांचे कवतिक नव्हते, तो महाराष्ट्राच्या सागरी इतिहासातील दृढनिश्चय, धैर्य आणि निर्भय प्रतिकाराचा झगमगता इतिहास होता.

खांदेरीवरील ताण कमी करण्याच्या दृष्टीने तिकडे मोरोपंतांनी इंग्रजांची राजापूरची वखार लुटली आणि इंग्रज शिपायांना कैद केले. आता शिवबाराजेंतर्फे मोरोपंत आणि इंग्रजांमध्ये बोलणी सुरू झाली. त्यात मराठ्यांतर्फे इंग्रज कैद्यांची मुक्तता आणि शिबाडांची भरपाई म्हणून १०० खंडी सुपारी चौल येथे पाठवण्याचा आणि बदल्यात इंग्रजांनी आपले आरमार मागे घ्यावे, अशा अटींवर तह

सुखासाठी जे काही कराल त्यात आनंद मिळेलच असे नाही,
परंतु आनंदाने जे काही कराल त्यात सुख नक्कीच मिळेल.

झाला. इंग्रज राजी झाले आणि २८ जानेवारी १६८० रोजी कॅप्टन डरटनला माघारी येण्याचे मुंबई कौन्सिलचे पत्र मिळाले. त्याप्रमाणे ३० जानेवारी १६८० रोजी इंग्रजांचे आरमार मुंबईस परतले.

खांदेरीवरील सामुद्री झुंजींनी मराठ्यांच्या कांही त्रुटी उघड केल्या असल्या, तरी त्यांचा आपल्या आरमारावरील आत्मविश्वास, साहस, योग्य नियोजन-आराखडा आणि नौकानायकांची प्राणपणाने लढण्याची वृत्ती प्रगट झाली. त्या काळातील कोणत्याही भारतीय शक्तीने इंग्लंडसारख्या सर्वोत्तम सागरी सामर्थ्याला उघड आव्हान दिले नव्हते - ते शिवाजीमहाराजांनी यशस्वीरीत्या दिले. मराठ्यांनी खांदेरीच्या बांधकामाच्यावेळी दाखवलेली धग पुढेही कायम राहिली. पुढे सुमारे अडतीस वर्षानंतर (जून १८, १७१८) विजयदुर्गाच्या लढाईत चांगलाच मार खाऊन इंग्रजी आरमार मुंबईला परतले. मुंबईचा गव्हर्नर चार्लस् बूनचा चांगलाच हिरमोड झाला. पण त्याने ध्यास सोडला नाही. परत एकदा पूर्ण तयारीनिशी अफाट आरमार घेऊन मोठ्या युद्धाची तयारी करण्याचे ठरले आणि विजयदुर्गाच्या आधी आंग्रांच्या ताब्यातील इतर कांही ठाण्यांवर चालून जाण्याचे त्याने ठरवले. त्यासाठी त्याने मुंबईजवळील खांदेरीची निवड केली. १ नोव्हेंबर १७१८ रोजी खांदेरी मोहिमेसाठी इंग्रजी आरमाराने नांगर उचलले. या आरमारात विक्टरी, ब्रिटानिया, रिव्हेंज, फेम, हॉक, ईगल, प्रिन्सेस अमिलिया, डिफायन्स, ड्रेक, सालमॅण्डर, अंटेलोप, हाऊंड, टायगर, फ्लाय, फेरेट, वीझाल, लेपल, स्क्रिरल, टेरिबल, हंटर, बॉम्ब ही लढाऊ जहाजे सामिल होती. त्यापैकी हंटर, बॉम्ब, सालमॅण्डर ही मोठी बॉम्बफेकी जहाजे होती. बूनने स्वतःच या मोहिमेचं नेतृत्व करण्याचे ठरवले. 'ॲडिसन' नावाच्या एका मोठ्या जहाजावर तो स्वतः हजर होता. दोन दिवस त्या आरमाराने केवळ अंदाज घेण्यात घालवले. खांदेरीच्या दक्षिणेकडील तटबंदीवर हल्ला करण्यासाठी इंग्रजी जहाजे रांगेत उभी करण्यात आली. ३ नोव्हेंबरला सूर्योदयास इंग्रजी जहाजांवरून तोफांचा भडिमार सुरू झाला. परिणाम काहीच झाला नाही. तोफगोळे किल्ल्यापर्यंत पोहोचत नव्हते. आंग्रांच्या दोन गुराबा तेवढ्यात बूनला दिसल्या म्हणून व्हिक्टरी आणि रिव्हेंज ही लढाऊ जहाजे त्यांच्यावर सोडण्यात आली. त्या दोन गुराबांच्या पाठी आंग्रांच्या चौदा गलबतांचा ताफा पाहिल्यावर मग दोन्ही इंग्रजी जहाजांनी माघार घेतली. रात्री इंग्रजांनी तोफांचा भडिमार थांबवला. खांदेरीचे नुकसान किती झाले याचा अंदाज इंग्रजांना आला नाही. शिवाय कान्होजींचे आरमार केवढे आहे याची माहितीही त्यांना मिळाली नाही. तेंव्हा बूनने सावध पवित्रा घेत, दुसऱ्या दिवशीचे डावपेच कसे आखायचे याची चर्चा इतर कप्तानांसोबत करून योजना आखली. त्यानुसार तोफांचा भडिमार करून पायदळ उतरवण्याचे ठरले. बॉम्बफेकी जहाजं पुढे आली. कॅप्टन जॉन मिल्सच्या नेतृत्वाखाली साडे-पाचशे सैनिकांची पलटन खांदेरीवर हल्ला करण्यास सज्ज झाली. इंग्रजी तोफांचा भडिमार किल्ल्यावर होत असतांना खांदेरीतून मात्र कोणताच प्रतिकार होत नव्हता. खांदेरीत पुरेसा दारूगोळ्याचा साठा नसावा असे बूनला वाटले. इंग्लिश जहाजे पुढे सरकली. ते जसे किल्ल्याकडे सरकू लागले तसा वरून गोफणगुंडा सुरू झाला. गोफणांतून येणाऱ्या दगडगोट्यांनी इंग्रजांची त्रेधातिरपीट उडाली. बंदुकीच्या गोळ्यांपेक्षा गोफणीची ही मराठी करामत सरस ठरली. पहिल्याच फटक्यात अठरा इंग्रजी शिपाई मृत्युमुखी पडले. पन्नासेक जखमी झाले. शिपायांनी मग पडावांकडे पळ काढला. त्याचवेळी एका इंग्रजी जहाजाची तोफ फुटली आणि त्यांची आणखी मनुष्यहानी झाली. त्या कोलाहलातच किल्ल्यावरून मराठा तोफा धडाडू लागल्या. खांदेरीवर दारूगोळा नाही हा इंग्रजांचा समज खोटा ठरला. किल्ल्यावरील बारा तोफांनी इंग्रजी जहाजांचे

बरेच नुकसान केले. बून व इतर अधिकारी फारच वैतागले. पण तेही आता इरेस पेटले आणि दुसऱ्या दिवशी निर्णायक हल्ला करण्याची बूनने जय्यत तयारी केली.

७ नोव्हेंबर १७१८ चा दिवस उजाडला. इंग्रजी जहाजांवरून तोफांची सरबत्ती सुरू झाली. धुराने वातावरण कोंदून गेले. मेजर सॅप्टन, कॅप्टन कॉक्सिज, गिडियन रसेल, क्लेमंट डाऊनिंग अशा कॅप्टन्सच्या नेतृत्वाखाली इंग्रजी पायदळही खांदेरी ताब्यात घेण्यासाठी तयार ठेवण्यात आली. तेवढ्यात कॅप्टन कॅस्ट्रोने आपली दोन जहाजे खांदेरीवर नेली. त्यातून शिपाई बेटावर उतरत असतांनाच खांदेरीवरून मोठा मारा झाल्याने त्यात तीस-चाळीस इंग्रजी शिपाई मारले गेले. कांही इंग्रजी पडाव जोरदार लाटांमुळे खडकांवर आपटले. तरीही गिडियन रसेलची तुकडी खांदेरी किल्ल्याच्या दाराजवळ पोहोचली. त्यांच्यावर गोफणगुंडा सुरू झाला. मराठ्यांनी आता बंदुकीतूनही मारा सुरू केला. यात गिडियन रसेल जखमी झाला. त्याला जहाजावर हलविण्यात आले. दुसऱ्या दिवशी तो मरण पावला. इंग्रजांनी आता हातबॉम्ब टाकणारी तुकडी पुढे काढली. कांही सैनिकांनी कुऱ्हाडींनी किल्ल्याचा दरवाजा फोडण्याचाही प्रयत्न केला. स्टॅप्टनच्या सैनिकांनी दरवाजासमोर येऊन तो उघडण्याचा प्रयत्न करत असतांना किल्ल्यातून इतका जोरदार मारा झाला की, इंग्रजांना पळ काढावा लागला. मनुष्यहानी मोठीच झाली. माघार घेण्याचे दु:ख बूनला झाले. एवढी मोठी तयारी करून जर खांदेरी घेता येत नसेल तर करायचे तरी काय? असा प्रश्न त्याला पडला.

खांदेरीहून मराठे जोरात लढले. किल्ल्यात पाचशेहून जास्त सैनिक नसावे. मात्र तिथला किल्लेदार हा मोठा लढवय्या होता. कान्होजी आंग्रांनी त्याच्यावर विश्वास ठेऊनच त्याला किल्लेदारी दिली होती. त्याचे नांव होते माणकोजी सूर्यवंशी. पन्नास-साठ मोठ्या इंग्रजी जहाजांनी खांदेरी वेढली असतांना त्याने निकराने त्याला तोंड दिले. किल्ल्यात दारूगोळा किती आहे याचा अंदाज इंग्रजांना आला नाही. गोफणगुंड्यांनी काम चोख बजावलं. किल्ल्यावर फक्त बारा तोफा होत्या. त्या माणकोजीने योग्य वेळीच वापरल्या. दारूगोळा वाया जाऊ दिला नाही. त्याच्या डावपेचांनी इंग्रजांची धाबी दणाणली. बूनने एकूण नुकसानीचा अंदाज घेतला आणि आपला आततायी हट्ट मागे घेण्याचे ठरविले. इंग्रजांनी माघार घेतली आणि इंग्रजी काफिला मुंबईकडे निघाला. खांदेरीवरून फतह मुबारकची फक्त एक तोफ वाजली. त्या लढाईत मराठ्यांनी असामान्य मनोधैर्य दाखवले. माणकोजी सूर्यवंशीचा निग्रह अपूर्व ठरला.

अशाप्रकारे अनेक अग्निदिव्ये अनुभवलेला खांदेरीचा किल्ला आहे तरी कसा, ते आपण आता बघू. किल्ले खांदेरीस भेट देण्यासाठी आपणास अलिबाग-जवळील थळ या गावी जावे लागते. इथून सुमारे पाऊण तासाच्या जलप्रवासानंतर आपण खांदेरीस पोहोचतो. खांदेरी किल्ल्याचे दोन मुख्य भाग पडतात. या दोन्ही भागांच्या बरोबर मधोमध बोट थांबते. बोटीतून पायउतार होताच पुढे दोन वाटा फुटतात. एक वाट दीपगृहाकडे, तर उजवी वेताळाच्या मंदिराकडे जाते. हा वेताळ येथील कोळी बांधवांचे श्रद्धास्थान असल्याने त्यांचा इथे नेहमीच राबता असतो. हे मंदिर पाहून तटफेरी करण्यासाठी पुढे गेल्यावर एका बुरुजावर एक तोफ दिसून येते. पुढे तटबंदीवरील विस्तृत फांजीवरून चालत गेल्यावर डावीकडे खाली चुण्याचा घाणा व तोफ दिसते. इथे जवळच तटबंदीमध्ये दारूकोठाराची वास्तू आहे. दारूकोठार पाहून पुढे गेलो असता खोलवर व बांधकाम केलेले पाण्याचे टाके दिसते. ते पाहून जिन्याने आपण परत तटबंदीवर यायचे. पुढे एका बुरुजावर तीन अजस्र तोफा आपणांस पहावयास मिळतात. यातील दोन तोफा तोफगाड्यावर आहेत. या तोफा पाहून पुढे गेल्यावर एका बुरुजावर कोठारासारखी व्यवस्था केलेली दिसून

येते. पुढे तटबंदीवर एका ठिकाणी हेलिपॅडची सोय करण्यात आली आहे. या हेलिपॅडच्या बरोबर खाली असलेल्या तटबंदीत चोरदरवाजा आहे. यातून बाहेर आलो की आपणांस फक्त दगड एकमेकांवर ठेऊन बांधून काढलेल्या खांदेरीच्या तटबंदीचे सुंदर दर्शन घडते. चोर दरवाजा पाहून पुढे आल्यावर खांदेरी किल्ल्यावरील पाण्याचा मुख्य स्रोत असलेले प्रचंड मोठे व खोदून काढलेले टाके लागते. या बेटावर आधी पोर्तुगीजांनी किल्ला बांधण्याचा विचार केला होता, पण पाण्याची सोय नसल्याने तो रहित केला. मात्र महाराजांनी जेंव्हा या बेटाचे निरिक्षण केले, तेंव्हा त्यांनी येथे गोड्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी येथील कातळ खोदून टाकी बांधण्याचा सल्ला दिला. या टाक्यातील दगड हा तटबंदी, बुरूज बांधण्यासाठी वापरला गेला व टाके झाल्याने गडावर पाण्याची पण सोय झाली. हे कातळात खोदलेले टाके पाहून थोड्या उंचीवर आल्यावर या टाक्याजवळ गणपतीचे छोटेखानी मंदिर आहे. पुढे एका बुरुजावर आपणांस लोखंडी गाड्यावर ठेवलेली एक व जमिनीवर पडलेली एक तोफ दिसून येते. तटबंदीवरून फिरतांना डाव्या हाताला पाण्याचे अजून एक बांधीव टाके दिसून येते. वाटेत एका बुरुजावर आपणांस आणखी तीन तोफा दिसून येतात. यातील एका तोफेला कुत्र्यासारखे तोंड आहे.



किल्ले खांदेरीवरील गाड्यावर ठेवलेली तोफ

पुढे आपण किल्ल्यात प्रवेश केलेल्या ठिकाणाजवळ येऊन पोहोचतो. येथील बुरुजावर दर्याची एक छोटेखानी वास्तू आहे. याच बुरुजाच्या पायाशी पाण्याची एक कोरडी विहीर आहे. खांदेरी किल्ल्याचे एक महत्त्वाचे आकर्षण म्हणजे या ठिकाणी एक भलामोठा दगड आहे. त्यावर छोटा दगड आपटून पाहिला तर घंटानाद-सारखा ध्वनी ऐकू येतो. या दगडात लोहाचे प्रमाण जास्त असल्याने असा ध्वनी ऐकू येतो. पुढे पायऱ्यांची एक वाट दीपगृहाकडे जाते, तर दुसऱ्या वाटेने आपण गडप्रवेश केलेल्या ठिकाणी पोहचतो. खांदेरी किल्ल्याच्या दोन्ही टेकड्यांच्या मधल्या सपाटीवर मारुतीचे मंदिर, आग्यावेताळाचे मंदिर व एक कबर आहे. अशाप्रकारे खांदेरीची आपली भटकंती पूर्ण होते.



खांदेरीवरील वैशिष्यपूर्ण खडक

किल्ला कांही फार मोठा नाही. पण समुद्रावर मराठ्यांची सत्ता निर्माण होऊ शकते, हा दृढ विश्वास आणि मराठे ती टिकवूही शकतात हा आत्मविश्वास एतद्देशीयांच्या मनात निर्माण करण्यात खांदेरी यशस्वी ठरला. याच आत्मविश्वासामुळे पुढे मराठा आरमाराने आपल्या यशाची पताका हिंदी महासागरावर फडकत ठेवली हे विसरून चालता येणार नाही. हेच याचे फलित आहे.

**- श्री दिलीप नारायण वंडलकर**

४, नरकेसरी सोसायटी,उज्ज्वलनगर,

वर्धा रोड, नागपूर- ४४००२५

मो.क्र.९८३४६३६६५५

इ-मेल- wandalkardilipgmail.com

●●●

# गंधसंवेदन

*गंधसंवेदक उपकरणे जर लहान लहान होत राहिली, वायुवाहने (ड्रोन्स) जर लहान लहान होत राहिली तर काय होऊ शकेल याची ही झलक आहे! ही कल्पना रम्य असली तरी भविष्यात हे वास्तवातही येऊ शकणार आहे - संपादक*

मी उपकरणन शास्त्रात (इन्स्टुमेंटेशनमधे) अनेक दशके काम करत आहे. तापमान, दाब, वारंवारिता (फ्रिक्वेंसी), विद्युतप्रवाह इत्यादी अनेकानेक चलांच्या नोंदींकरता निरनिराळ्या कृत्रिम संवेदकांचे शोध लागलेले पाहिले आहेत. मानवी संवेदना रस, रूप, गंध, स्पर्श आणि शब्द संवेदू शकतात. त्यांपैकी रूप (कॅमेरे), स्पर्श (जवळीक संवेदक, प्रॉक्झिमिटी सेन्सर्स) आणि शब्द (ध्वनीसंवेदक) संवेदण्याकरता आजवर अनेकानेक कृत्रिम संवेदकांची निर्मिती झालेली आहे. मात्र रस (चव) आणि गंध (वास) संवेदणारी कृत्रिम साधने काही फारशी पाहण्यात आलेली नाहीत. ती जर सिद्ध करता आली तर वर्तमानयुगात विस्मयकारक कर्तबे साधली जाऊ शकतील. एखाद्या माणसाचा गंध एकमेवाद्वितीय असतो. त्या गंधाने त्याची ओळख पटू शकते. अनेक पशुपक्षी व प्राण्यांचेही गंधसंवेदन मानवी सामर्थ्यांच्या पार पलीकडे पोहोचलेले असते. त्यामुळेच चोरांचा शोध घेण्याकरता कुत्रे वापरले जात असतात. आता संवेदकही कसा असावा? तर कुणीही जाणकार सांगू शकेल की, तो सूक्ष्मातिसूक्ष्म असावा. कल्पना करा की, असा एक अत्यंत लहान सशक्त गंधसंवेदक उपलब्ध झाला आहे. त्याचा आकार मुंगीएवढा आहे. माशीइतक्या वायुवाहनावर (ड्रोनवर) तो सहज बसवता येतो आहे. एखाद्या व्यक्तीचा गंध अचूक संवेदू शकत आहे.

१ मे २०२६ चाबहार बंदरः विख्यात इराणी शास्त्रज्ञ अंजुमन शरीफ यांचा राहत्या घरात स्फोट होऊन जागीच मृत्यू झाला. त्यांच्या शरीराचे ओळख पटू शकतील असे कोणतेही अवशेष मागे शिल्लक राहिले नाहीत. सारे शरीरच बेचिराख झाले. आश्चर्याची गोष्ट ही आहे की, ते राहत होते त्या इमारतीच्या इतर कोणत्याही भागास किंचितही झळ न पोहोचता, दुसऱ्या मजल्यावरील त्यांच्या खोलीच्या खिडकीतून स्फोटक आत शिरून त्याचा स्फोट झाला आणि स्फोटात केवळ अंजुमन हे एकटेच मारले गेले. मॉर्निंग वॉककरता ते बाहेर पडले. फिरून परत आले आणि लगेचच स्फोट झाला असावा.

इथे हेही सांगायला हवे की, भारत सरकारने चाबहार बंदर विकसित करण्याचे काम हाती घेतले आहे. अंजुमन हे तत्संबंधी कामाकरताच तर तिथे इराणने नियुक्त केलेले होते.

मी दररोज सकाळी ७ ते ८ दरम्यान फिरायला जात असे. घरातून बाहेर पडायचाच अवकाश की, तीन-चार माशा माझा पाठलाग करू लागत. कधी या कानावर बस. तर कधी त्या कानाशी गूँ गूँ कर. कधी मानेवरील घामाच्या ओघळावर बस. तर कधी चष्म्याच्या दांडीमागील भुवईच्या केसांशी सलगी कर. अशा त्यांच्या कारवाया निरंतर सुरू राहत. एकदा तर गोंधळून एकीने माझ्या श्वासासोबत नाकातच प्रवेश मिळवल्याने, तिला हुसकावून लावता लावता माझी फारच तारांबळ उडालेली होती. शेजारून कुणी व्यक्ती पार झाला वा वाहन जोराने गेले तर हवेने त्या जरा विचलित होत असत. मात्र निष्ठेने माझाच पाठलाग करत राहण्यातील त्यांच्या सातत्याने मी विस्मयचकित होत असे. बरं; रस्त्यावरील इतर व्यक्तींना गाठून त्या त्यांच्यासोबत निघून जातील असे कधीही झाले नाही. एवढे मात्र खरे की, घरी परतल्यानंतर मात्र मला त्या कधी दिसतही नसत. अगदी दुसऱ्या दिवशी फिरायला बाहेर पडेपर्यंत मला त्यांच्या त्रासाची आठवणही येत नसायची.

वामनराव मला विचारत होते, काय हो, हल्ली वायुवाहने (ड्रोन्स) फारच सूक्ष्म आकारमानात तयार करता येऊ लागलेली आहेत असे ऐकतो. लहानात लहान वायुवाहन किती आकारमानाचे असू शकेल?

मी म्हणालो, अहो वामनराव, अगदी माशी किंबहुना डास म्हणावा इतक्याही आकारमानाची स्वयंचलित वायुवाहने आजमितीला निर्मिली जात आहेत. जितकी लहान, तितकीच त्यांना लागणारी ऊर्जा कमीतकमी. मात्र त्यांचे वजन वाहून नेण्याचे सामर्थ्यही त्यांच्या आकारमानासोबतच घटत असते. डासाच्या पंखावर बसवता येतील अशी सौर पटलेही हल्ली उपलब्ध झालेली आहेतच. ती बसवली की हे कृत्रिम डास हवे तसे विहरायला मोकळे!

वामनराव म्हणाले, ते खरे आहे!, मात्र त्यांचे संचालन कोण आणि कसे करणार?

वामनराव, आज जर कृत्रिम गंधसंवेदक उपलब्ध असते तर ते विशिष्ट गंधाचा माग घेत स्वयंचलित होऊ शकले असते. त्यावर भूस्थाननिर्देशक (जी.पी.एस.) बसवणे त्यामानाने सोपे आहे. जेणेकरून त्या वायुवाहनाचे वर्तमान स्थान त्याच्या प्रायोजकास सतत माहीत होत राहील.

वामनराव म्हणाले, काय हो, चाबहार बंदरात इराणी शास्त्रज्ञ अंजुमान शरीफ मारले गेले अशी बातमी आहे. खरी आहे की काय ती?

मी म्हणालो छे हो!, तुम्हाला सांगायला हरकत नाही, पण आज ते सुरक्षितरीत्या भारतात आणलेही गेले आहेत. शत्रुला गंधसंवेदकाचा शोध लागला. त्यांनी माशीइतक्या वायुवाहनाने मॉर्निंग वॉकला गेलेल्या अंजुमान यांचा माग काढला. ते घरी पोहोचताच नेमके प्रक्षेपणास्त्र खिडकीतून डागून त्यांचा घात केला हे खरेच आहे. मात्र अंजुमन घरात शिरलेच नाहीत. दरवाजापाशी पोहोचताच त्यांना मोबाईलवर कुणीतरी खाली बोलावले. खाली त्यांच्या ओळखीचेच एक भारतीय वैज्ञानिक त्यांच्या स्वागताला उभेच होते. दोघे त्यांच्या गाडीत बसले. गाडी विमानतळावर गेली. दोघांचीही कागदपत्रे तयारच होती. मुंबईचे विमान सुटणार होते. दोघे नीट स्थानापन्न झालेत अशी खात्री करूनच ते उडाले.

अहो, पण अंजुमन नेमके दाराशी पोहोचले आहेत, आणि लगेचच आत स्फोट होणार आहे, हे भारतीय वैज्ञानिकांना कळले तरी कसे? वामनराव म्हणाले.

ते आत येताच स्फोट व्हावा हे नियोजन गुप्तचर यंत्रणेकडून कळाले. अंजुमन फिरायला गेल्यावर शत्रुचे वायुवाहन जसे त्यांचेभोवती घुटमळत होते, तसेच आपलेही वायुवाहनही त्यांचेभोवती फिरतच होते. त्यावर गंधसंवेदकही होते आणि ते ती व्यक्ती अंजुमनच असल्याची खात्रीही पटवत होते. इमारतीत शिरतांना सौर ऊर्जा बंद होऊन ते खाली पडले. त्याचे भूस्थाननिर्देश ग्रहण करून, भारतीय शास्त्रज्ञांनी फोन केला.

वामनराव म्हणाले, धन्यच आहेत हो आपले शास्त्रज्ञ!, आणि आपल्यालाही गंधसंवेदन साधले आहे ही बातमी तर फारच मोलाची आहे.

ही संपूर्ण कथा पूर्णतः काल्पनिक आहे. वास्तवाशी कुठे काही मिळतेजुळते आढळले तर तो योगायोग समजावा.

या कथेचा यथाशक्य कल्पनाविस्तार करताही येईल, मात्र तिच्यामुळे रस आणि गंध संवेदनातील संशोधनाची आवश्यकता जरी अधोरेखित झाली, तरी या कथेचा उद्देश पूर्तता पावला असेच म्हणावे लागेल.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) – ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

# मराठी साहित्यातील शांत समाधी: 'डोह'कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी

*ललित लेखनाला एक उंची देणारे व विचाक्षण संपादक श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांचे ६ ऑगस्ट २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या लेखनावर प्रकाश टाकणारा डॉ प्रशांत धर्माधिकारी यांचा लेख – संपादक*




मराठी ललित साहित्याच्या आणि संपादकीय परंपरेच्या क्षितिजावरील एक लखलखता नक्षत्र, ज्येष्ठ लेखक आणि संपादक श्रीनिवास विनायक कुलकर्णी (श्रीवि) यांच्या जाण्याने मराठी भाषा आणि साहित्य विश्वाचे भरून न येणारे नुकसान झाले आहे. २० नोव्हेंबर १९३६ रोजी सांगली जिल्ह्यातील कृष्णाकाठच्या 'औदुंबर' या निसर्गरम्य गावी त्यांचा जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण औदुंबर येथेच झाले, तर इयत्ता सातवीपर्यंतचे शिक्षण अंकलखोप येथे पूर्ण झाले. त्यानंतरचे पुढील शिक्षण त्यांनी सांगलीतील 'अनाथ विद्यार्थी आश्रम' या संस्थेत राहून पूर्ण केले. त्यांच्या घरातच कलेचा आणि साहित्याचा समृद्ध वारसा होता; आजोबा आणि वडील दोघेही चित्रकार होते. शिक्षण संपल्यानंतर सुरुवातीच्या काळात त्यांनी दोन वर्षे साइन बोर्ड पेंटिंगचा व्यवसाय केला आणि त्यानंतर ओगलेवाडी येथील काच कारखान्यात हिशोब खात्यात नोकरी केली. पुढे त्यांनी मराठी साहित्य विश्वात आदरस्थान असलेल्या 'मौज' या नियतकालिकाच्या संपादन विभागात प्रदीर्घ काळ अत्यंत निष्ठेने व जबाबदारीने कार्य केले.

कौटुंबिक चित्रकलेचे संस्कार, औदुंबरच्या परिसरातील समृद्ध निसर्ग, झाडे, पक्षी, कृष्णा नदी आणि तिच्या डोहांचे सूक्ष्म निरीक्षण या सर्व गोष्टींनी श्रीनिवास कुलकर्णी यांचे मन अत्यंत संवेदनक्षम आणि संस्कारशील घडवले. लहानपणापासूनच त्यांचा कवितेवर आत्यंतिक जीव होता. ते इयत्ता चौथीत असताना त्यांनी लिहिलेली पहिली कविता पां. ना. मिसाळ यांच्या 'बालसन्मित्र' या पत्रिकेत प्रसिद्ध झाली होती. पुढे काही कारणास्तव त्यांचे कवितालेखन थांबले आणि त्याची खंत त्यांच्या मनात नेहमीच राहिली; मात्र कवितेवरील त्यांची श्रद्धा कधीही कमी झाली नाही. हीच काव्यात्मक संवेदनशीलता त्यांच्या गद्यात इतकी उतरली की, ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांनी त्यांच्या लेखनाचा गौरव करताना म्हटले होते– बालकवींच्या प्रतिभेने कविता न लिहिता जर गद्य लिहिले असते, तर ते लेखन श्रीनिवास कुलकर्णी यांचेच लेखन झाले असते. ऑगस्ट १९६० मध्ये 'सत्यकथा' पत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या 'मनातल्या उन्हात' या लेखापासून त्यांच्या ललित लेखनाच्या सुवर्णप्रवासाला सुरुवात झाली.

**बालसुलभ भावविश्व आणि 'डोह'ची निर्मिती**

१९६५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'डोह' या त्यांच्या पहिल्याच ललित लेखसंग्रहाने मराठी साहित्य विश्वात आणि वाचकांच्या मनात एक वेगळेच अढळ स्थान निर्माण केले. या संग्रहात लेखकाच्या बालपणातील सोन्यासारख्या आठवणी अत्यंत कोमलतेने चित्रित झाल्या आहेत. औदुंबरचा परिसर, तेथील निसर्ग, कृष्णा नदी, डोह आणि लहान मुलांचे निखळ भाव–विचार–विश्व त्यांनी यात उभे केले. 'आम्ही वानरांच्या फौजा',

'मृगजळाच्या यक्षघराला', 'शब्दांच्या संध्याकाळी' यांसारख्या लेखांच्या शीर्षकांपासूनच या लेखनातील वेगळेपण आणि गूढता वाचकाला आकर्षित करते. प्रौढ मनाने बालवयात शिरून बालकाच्या निष्पाप नजरेने टिपलेले हे जग निव्वळ स्वप्नरंजन नसून तो अनुभवांचा जिवंत दस्तऐवज आहे.

### गूढ, अतींद्रिय अनुभव आणि 'सोन्याचा पिंपळ'

१९७५ मध्ये प्रकाशित झालेला 'सोन्याचा पिंपळ' हा संग्रह 'डोह'पेक्षा अगदी वेगळ्या अनुभूतीकडे घेऊन जातो. यामध्ये प्रौढ मनाला जाणवणारे अतींद्रिय, काहीसे गूढ आणि देहातीततेचे भावविश्व शब्दबद्ध झाले आहे. 'आस्तिक-आस्तिक' मधील सापांचे विविध अनुभव असोत किंवा 'धनानि भूमौ' मधील गुप्तधनाविषयीच्या कथा असोत, हे लेखन वाचकाला एका वेगळ्याच पातळीवर घेऊन जाते. 'घंटीवाला' या लेखात आपल्या धाकट्या भावाच्या मृत्यूपर्यंतचा प्रवास त्यांनी मांडला आहे, जो वाचताना तटस्थ आणि आत्मनिष्ठ अशा दोन्ही भावनांचा एकाच वेळी प्रत्यय देतो. तसेच, 'डोह' आणि 'सोन्याचा पिंपळ' या दोन्ही संग्रहांतून लेखक आणि त्यांच्या वडिलांमधील प्रगल्भ व रेशमी नातेसंबंध अत्यंत सुंदरपणे उलगडले आहेत.

### वात्सल्य, मानवी नाती आणि 'पाण्याचे पंख' व 'कोरडी भिक्षा'

१९८७ मध्ये आलेला 'पाण्याचे पंख' हा संग्रह घरात आणि सभोवती वावरणाऱ्या लहान मुलांच्या खेळकर जगावर भाष्य करतो. अलोक, पदम, मनू, मिकी अशा लहान मुलांचे हसणे, खेळणे आणि बागडणे लेखकाने आपल्या हळव्या नजरेतून टिपले आहे. त्यानंतर २००० मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'कोरडी भिक्षा' या संग्रहात अनेक विविध व्यक्तिचित्रे आली आहेत. माणसाच्या स्वभावातील विविध पदर, त्यांची सुख-दुःखे आणि अंतर्मनाचा शोध या संग्रहातील लेखांमधून अतिशय बारकाईने घेतला गेला आहे. हे सर्व चारही ललित संग्रह 'मौज प्रकाशना'तर्फे प्रसिद्ध झाले असून, त्यातील सर्व लेख प्रथम 'सत्यकथा' आणि 'मौज' या नियतकालिकांमधूनच वाचकप्रिय झाले होते.

### चित्रदर्शी शब्दकला आणि मौनाची भाषा

श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या लेखनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची चित्रदर्शी शब्दकळा. घराण्यातील चित्रकलेच्या संस्कारामुळे त्यांच्या गद्यात एक प्रकारची दृश्यमयता आणि निसर्गाच्या सूक्ष्म निरीक्षणाचा बारकावा दिसून येतो. त्यांची लेखनशैली पारदर्शक असून ती अनुभवाचा थेट तळ गाठते. भाषेचा अवाजवी किंवा भपकेबाज वापर न करता, अत्यंत संयमित, मोजक्या आणि मौनाशी नाते सांगणाऱ्या शब्दांतून आत्मिक अनुभूती देणे ही त्यांची मुख्य शैली होती. त्यांनी मराठी ललित साहित्याला एक वेगळीच परिपक्वता आणि उंची मिळवून दिली.

### संपादकीय निष्ठा आणि सर्वोच्च बहुमान

श्रीवि यांनी केवळ स्वतःच्या लेखनावर लक्ष केंद्रित न करता, 'मौज' नियतकालिक आणि प्रकाशन संस्थेच्या संपादन विभागात राहून मराठी साहित्य संस्कृतीची अहोरात्र सेवा केली. त्यांनी अनेक नव्या-जुन्या लेखकांच्या आणि कवींच्या साहित्याला पैलू पाडले. स्वतः उत्तम लेखक असूनही ते प्रसिद्धीपराङ्मुख राहिले. त्यांच्या या प्रदीर्घ, निष्ठामयी आणि दर्जेदार साहित्यिक योगदानाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांना साहित्यातील सर्वोच्च अशा 'विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित केले होते.

श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्यारूपाने मराठी ललित साहित्यातील एक सौंदर्यवादी, संयमी आणि आत्मीय पर्व शांत झाले आहे, परंतु त्यांनी निर्माण केलेली ही शब्दसृष्टी मराठी वाचकांच्या हृदयात सदैव अमर राहील.

**- डॉ. प्रशांत पुरूषोत्तम धर्माधिकारी**
सहाय्यक प्राध्यापक इंग्रजी विभाग
सेंट्रल यूनिवर्सिटी ऑफ गुजरात, वडोदरा
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

जी लोकं सरळ 'मनात उतरतात', त्यांना सांभाळून ठेवा आणि
जी 'मनातून उतरतात', त्यांच्यापासून सावध रहा !

# परिसर वार्ता

**– संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

शाळेच्या इंग्रजी माध्यम प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शाळेत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषाने संपूर्ण शाळेचा परिसर दुमदुमून गेला.




या प्रसंगी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून वारकऱ्यांची दिंडी साकारली. डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात भगवे झेंडे आणि टाळ-मृदंगाच्या गजरात विद्यार्थ्यांनी दिंडीत उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी सुंदर अभंग, भक्तिगीते आणि लेझीम सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. काही विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि इतर संतांच्या वेशभूषेतून त्यांच्या विचारांचा संदेश दिला. विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीची माहिती देण्यात आली.



विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे इयत्ता ४थी ची विद्यार्थिनी अनुश्री बापे हिने कीर्तन गायले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे कार्य, भक्ती, समानता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश समजला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी ज्ञानोबा-तुकाराम आणि 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल' असा जयघोष केला. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.





## ज्ञानाची वाट दाखविणाऱ्या गुरूंना कृतज्ञतेची मानवंदना!

गुरू म्हणजे ज्ञान, संस्कार आणि जीवनाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक. या गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे आणि शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेच्या प्राथमिक विभागात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलमय वातावरणात गुरूश्लोकाच्या सामूहिक पठणाने झाली. विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगत गुरुंच्या जीवनातील स्थान अधोरेखित केले. विविध वर्गांतील विद्यार्थ्यांनी गुरूंना समर्पित कविता, भाषणे, गीत आणि सांस्कृतिक सादरीकरणातून आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना फुले व हस्तनिर्मित शुभेच्छापत्रे देऊन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी महर्षी व्यास यांच्या कार्याची, तसेच व्यासपौर्णिमेचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुरूंचा आदर, ज्ञानाची कास, शिस्त आणि चांगले संस्कार यांचे महत्त्व पटवून दिले.



यशासाठी बनवलेले नियोजन अर्धवट सोडू नका, त्यामधून काहीतरी चांगले मिळवाच.

विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय व भावपूर्ण झाले. गुरू हे केवळ ज्ञान देत नाहीत, तर जीवनाला योग्य दिशा देतात, हा संदेश या उत्सवातून विद्यार्थ्यांच्या मनावर ठसला.

### दप्तराच्या ओझ्यापासून एका दिवसासाठी मुक्ती, आनंदातून शिक्षणाची अनुभूती!

विद्यार्थ्यांना नेहमीच्या शालेय अभ्यासापेक्षा वेगळ्या पद्धतीने अनुभवातून शिकता यावे, त्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा आणि शिक्षण अधिक आनंददायी व्हावे, या उद्देशाने शाळेच्या प्राथमिक विभागात 'No Bag Day' उत्साहात साजरा करण्यात आला.

या दिवशी विद्यार्थ्यांनी दप्तराचे ओझे बाजूला ठेवून विविध कृतीआधारित, मनोरंजक आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. कला, खेळ, संगीत, नृत्य, तसेच विविध मनोरंजक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग नोंदवला. प्रत्यक्ष कृतीतून शिकताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून येत होता.



विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांनी संघभावना, सहकार्य, सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि शिस्त यांसारखी जीवनमूल्ये आत्मसात केली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसोबत सहभागी होत हा दिवस अधिक आनंददायी व संस्मरणीय केला.

'No Bag Day'मुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या चौकटीबाहेर जाऊन अनुभवातून शिकण्याची आणि आपल्या कलागुणांना वाव देण्याची संधी मिळाली. दप्तर नसले तरी शिक्षण थांबत नाही; अनुभवांच्या माध्यमातून शिकण्याची नवी दारे खुली होतात, हा सुंदर संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांना मिळाला.

### अभिमानास्पद क्षण : आंतरराष्ट्रीय स्पर्धा पातळीचा निकाल २०२५-२६

शाळेच्या प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्पेल बी इंटरनॅशनल - चौथी पातळी परीक्षेतील उल्लेखनीय यशाबद्दल आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

आमच्या विद्यार्थ्यांनी एकाग्रता, आत्मविश्वास आणि शब्दांवरील प्रेम यांचे उत्कृष्ट प्रदर्शन करत उज्ज्वल यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाचा आम्हाला मनापासून अभिमान आहे.

**प्रशस्तीपत्र (Certificate of Accomplishment)**

- इयत्ता तिसरी - प्रथमेश वर्तक - ९८ गुण
- इयत्ता दुसरी - यथार्थ झगडे - ९७ गुण
- इयत्ता दुसरी - इझान खानचे - ९६ गुण
- इयत्ता दुसरी - अथर्व म्हात्रे - ९६ गुण

**विशेष प्रावीण्य (Distinction)**

- इयत्ता तिसरी - रिया पिंपळे



या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन! तुमची मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत.

**तुमच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!**

### इयत्ता पहिलीच्या पालकांसाठी समुपदेशन सत्र

''पालक आणि शिक्षक यांचे सहकार्य हेच मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचे भक्कम पाऊल आहे.''

प्राथमिक विभागातील इयत्ता पहिलीच्या पालकांसाठी समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र बाल मानसशास्त्र व पालकत्व विषयातील तज्ज्ञ डॉ. सविता राव यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

या सत्रामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी संतुलित आहार, पुरेशी झोप आणि सकारात्मक पालकत्व यांचे महत्त्व विशद करण्यात आले. मुलांच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याबाबत पालकांना उपयुक्त मार्गदर्शन मिळाले.



डॉ. सविता राव यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि प्रेरणादायी विचार याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. तसेच या सत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सहकार्य करणाऱ्या सर्व पालकांचेही मनःपूर्वक आभार.

चला, आपण सर्वजण मिळून प्रेम, काळजी आणि समजूतदारपणाच्या माध्यमातून आपल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल बनवू या.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यमिक विभाग

AKJ Duo Dash - Kitchen Edition : पाककला स्पर्धेतून दृढ झाले पालक-पाल्याचे नाते!

शाळेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांच्या संकल्पनेतून AKJ Duo Dash - Kitchen Edition या अनोख्या अशा प्रथमच घेण्यात आलेल्या पालक-विद्यार्थी पाककला स्पर्धेचे आयोजन २२ जुलै २०२६ रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी केले होते.




अभ्यासाव्यतिरिक्त आनंददायी शिक्षणाला चालना देणे, त्यांचा अभ्यासाचा ताण थोडा कमी व्हावा आणि पाल्यांना एकत्र काम करण्यास प्रोत्साहित करणे, आरोग्यदायी आहाराचे महत्त्व जाणणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते.

या स्पर्धेत इयत्ता दहावीच्या २० विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. त्यांनी वेगवेगळ्या, नावीन्यपूर्ण, आरोग्यदायी पाककृतींचे अत्यंत आकर्षक पद्धतीने सादरीकरण केले. प्रत्येक जोडीने दाखवलेला उत्साह, टीम वर्क यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला.





या स्पर्धेत अतिशय वेगवेगळ्या पदार्थांची रेलचेल पाहण्यात आली. जसे की, झुकिनी नूडल्स आणि ठेचा पनीर, ड्राय फ्रुट मखाना, मँगो चीज केक, चणा मटका, विगन लेमन चीज केक इत्यादी. प्रत्येक स्पर्धकांनी अतिशय नावीन्यपूर्ण आणि कल्पकतेने या पदार्थांची मांडणी सजावट केली होती. असे म्हणतात ना की, अन्न पोटात जाण्याआधी ते डोळ्यांनी पाहूनच पोट भरते! याची प्रचिती या स्पर्धेतून आली.

अपयश मिळाल्यानंतर तुम्ही काय कृती करता यावरून तुम्हाला यश मिळेल की नाही हे ठरत असते!



या स्पर्धेसाठी शाळेच्या माजी शिक्षिका सन्माननीय सौ. स्मिता पिंगळे, सौ. निवेदिता दुर्वे आणि शाळेचे माजी विद्यार्थी, तसेच खाद्यपदार्थ क्षेत्रातील श्री. प्रदीप कर्वे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांच्या सूचना आणि प्रोत्साहन पूर्ण अभिप्रायाबद्दल शाळेने त्यांचे आभार मानले.

**स्पर्धेचे विजेते:**

- **प्रथम पारितोषिक:**
  कु. ईवा आणि सौ. क्षमा दक्षिणदास –
  Nutritious Super Food Smoothie
- **द्वितीय पारितोषिक:**
  कु. आर्या आणि सौ. अमृता पाध्ये -
  Coconut Mango Delight
- **तृतीय पारितोषिक:**
  कु. मनस्वी आणि सौ. मधुरा केतकर
  Dal Pakwan Shots
- **उत्तेजनार्थ पारितोषिक:**
  कु. सोहम आणि सौ. श्रुती बेडेकर
  Multi Millet Spinach Beetroot Nachos with Avocado Dressing
- कु. अनुश्री आणि सौ. मयुरा फडके
  The Open Bloom Sushi

सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पालक–पाल्यामधील हळवे नाते हे एकत्र व्यतीत केलेल्या वेळेतून अधिक दृढ करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. आरोग्यदायी जीवनशैली आणि कौटुंबिक बंध या आपल्या पारंपरिक संस्कार मूल्यांचे या कार्यक्रमातून सुंदर दर्शन घडले.

या स्पर्धेच्या निमित्ताने मनोगत व्यक्त करताना मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले म्हणाल्या, ''AKJ Duo Dash ही केवळ पाककला स्पर्धा नव्हती – तर हा एकजुटीचा उत्सव होता. पालक आणि मुले एकत्र पदार्थ बनवताना, सहकार्य करताना आणि प्रत्येक क्षणाचा आनंद घेताना पाहून सुवर्ण महोत्सवी वर्षाचा खरा अर्थ सार्थकी लागला. असे अनुभव आयुष्यभराच्या आठवणी देतात.''

खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम आनंदात संपन्न झाला आणि AKJ Duo Dash - Kitchen Edition हा शाळेच्या सुवर्ण महोत्सवी सोहळयाचा एक अविस्मरणीय क्षण ठरला.

**शाळा दुमदुमली विठ्ठल नामाच्या जयघोषाने!**

शाळेत दिनांक २४ जुलै २०२६ रोजी इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांमार्फत आषाढी एकादशी मोठ्या भक्तिभावाने, उत्साहात आणि सांस्कृतिक परंपरेने साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरा आणि वारीचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे पंढरपूरची पवित्र वारी करून आलेल्या शाळेतील शिक्षिका सौ. मनीषा साळी यांची मुलाखत इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी घेतली. त्यांनी वारी म्हणजे स्वार्थत्याग, नम्रता, समानता आणि अढळ भक्ती असे नमूद केले.

जात–धर्म, लहान–मोठा, गरीब श्रीमंत असा भेद न करता लाखो वारकरी एकमेकांना कसे सहाय्य्य करतात, आणि वारी ही खऱ्या अर्थाने एकात्मता आणि

माणुसकीचे प्रतीक कसे आहे, हे त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

पुढील सादरीकरणात या निमित्ताने विद्यार्थ्यांनी केवळ परिसरच नाही तर मन आणि हृदय देखील नकारात्मकतेपासून स्वच्छ ठेवण्याची शपथ घेतली. हाच आषाढी एकादशीचा खरा संदेश असल्याचे सांगण्यात आले. रंगीबेरंगी पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांनी दिंडी आणि रिंगण यांचे सादरीकरण पाहून आपण पंढरपुरातच आहोत की काय अशी क्षणभर जाणीव उपस्थितांना झाली.





भक्तिगीत आणि अभंगांच्या सादरीकरणाने संपूर्ण शालेय परिसर भक्तीमय झाला. कार्यक्रमाची सांगता प्रभू विठ्ठल आणि माता रुक्मिणीच्या प्रार्थनेने करत शालेय परिसरातून प्रभू विठ्ठलाचा जयघोष करत उत्साहात दिंडी काढण्यात आली.

या उपक्रमामुळे विद्यार्थी गणांना महाराष्ट्राची सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा जवळून समजली. तसेच भक्ती, करुणा, शिस्त आणि एकजूट या मूल्यांची प्रेरणा मिळाली. हा कार्यक्रम समस्त विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने अनुभवला असेल आणि वारकरी परंपरेबद्दल त्यांच्या मनात अधिक आदर निर्माण झाला असेल यात शंकाच नाही.

**शाळेत गुरुपौर्णिमेच्या दिवशी मुलांना लाभले आपल्या पहिल्या गुरूंचे म्हणजेच पालकांचे मार्गदर्शन!**

शाळेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे त्या उपक्रमांतर्गत आज दिनांक २९ जुलै बुधवार रोजी गुरुपौर्णिमाउत्सव अत्यंत अनोख्या आणि हृदयस्पर्शी पद्धतीने साजरा करण्यात आला.

प्राचीन भारतीय संस्कृतीतील 'मातृ देवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव' या मूल्यांना सामोरे ठेवत मुख्याध्यापिका डॉ. अस्मिता मोहिले यांनी ही संकल्पना मांडली आणि पालकांच्या सहकार्यामुळे ती प्रत्यक्षात उतरली. शिक्षणातील आई, वडील आणि गुरू या तीन स्तंभांचे महत्त्व अधोरेखित करणे हा यामागचा उद्देश होता. पालक हे मुलांचे पहिले गुरू असतात. या आपल्या भारतीय परंपरेला अनुसरून पालकांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरवातीस डॉ. मृणालिनी नेवाळकर आणि सर्व पालकांचा त्यांच्या पाल्यामार्फत शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाचा प्रारंभ मुख्य अतिथी डॉ. मृणालिनी नेवाळकर यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाने झाला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, ''गुणांपेक्षा ज्ञान, संस्कार आणि सामंज्यसपणा हे महत्त्वाचे आहे. जिज्ञासेने, कुतूहलाने शिका, गुणांच्या मागे धावू नका.''

कार्यक्रमाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला तो इयत्ता ८वीच्या पालकांनी विविध वर्गांवर अध्यापन केले, या उपक्रमाने. पालकांनी शिक्षकाची भूमिका साकारताना

आयुष्य पूर्ण शून्य झालं तरी हार मानू नका; कारण त्या शून्यासमोर किती आकडे लिहायचे ती ताकद तुमच्या हातात आहे!

विद्यार्थ्यांना फॅशन ड्रॉइंग, हिंदी साहित्य, चारित्र्य घडणीसाठी मूल्यशिक्षण, किशोरवयातील अडथळे, आयात-निर्यात, मराठी, गणित, व्यवस्थापन, भारतीय संस्कृती आणि संस्कार या विषयांवर मार्गदर्शन केले:

पालकांच्या अध्ययन पद्धतीमुळे वर्ग अधिक प्रभावी आणि संवादात्मक झाला.

हा उपक्रम शाळा-पालक यांच्यातील नाते अधिक दृढ करणारा ठरला. मूल्याधारित आणि समग्र शिक्षणाप्रती असलेली शाळेची बांधिलकी या कार्यक्रमातून पुन्हा दिसून आली.

**आंतरशालेय जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धा**

'कला चिल्ड्रेन अकॅडमी' तर्फे 'ऑल इंडिया आर्ट टॅलेंट' स्पर्धेच्या हस्ताक्षरस्पर्धेत कु. दुर्वा सचिन साळुंखे (५वी अ) या विद्यार्थिनीला आंतरशालेय जिल्हास्तरावर A+ ग्रेड मिळाली आणि ती विजेती ठरली. स्पर्धेचे पारितोषिक म्हणून तिला प्रमाणपत्र व मेडल प्राप्त झाले. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे २०२५-२६ मध्ये आयोजित २२व्या 'महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धे'तील प्राथमिक फेरीत पृथा साबळे (५वी ब) हिचा सहभाग असलेल्या 'दिव्याखाली दौलत' या नाटकास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**माध्यमिक शिष्यवृत्ती निकाल**

सन २०२५-२६ मधील इ. ७ वी च्या माध्यमिक शिष्यवृत्ती निकालात एकूण १० विद्यार्थ्यांपैकी ७ विद्यार्थी पात्र ठरले.

भारत सरकारच्या 'विज्ञान व तंत्रज्ञान विभाग', नवी दिल्ली मार्फत प्रतिवर्षी 'राष्ट्रीय बालविज्ञान परिषद' हा उपक्रम संपूर्ण भारतभर राबवला जातो. या वर्षी २०२६ साठी ठाणे जिल्हा समन्वयक म्हणून शाळेतील शिक्षिका सौ. उज्ज्वला धोत्रे यांची निवड झाली.

दि. १७ जुलै रोजी ईशा नेत्रालय, मुंबई मार्फत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची, तसेच शिक्षकांची वार्षिक डोळे तपासणी करण्यात आली.



१०वी चा निकाल ९०% पेक्षा जास्त लागल्याबद्दल शाळेचा सत्कार माननीय आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांच्या हस्ते करण्यात आला. हा सत्कार माननीय मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना वाघुले यांच्यावतीने शाळेचे शिक्षक श्री. जीवन जाधव यांनी स्वीकारला.



**शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळ**

विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून लोकशाही मूल्यांची रुजवणूक व्हावी, नेतृत्वगुणांचा विकास व्हावा आणि त्यांना निवडणूक प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा या उद्देशाने सकाळ व दुपार दोन्ही विभागात 'शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळ' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

हा उपक्रम संपूर्णपणे लोकशाही मार्गाने आणि पद्धतशीरपणे पार पाडण्यात आला. उमेदवारी अर्ज व छाननी, निवडणूक प्रचार, मतदान प्रक्रिया, मतमोजणी व निकाल या साऱ्या टप्प्यातून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांची निवड केली गेली.

मुख्यमंत्री - सकाळ विभाग - शिवम गाडगे

जिंकणे म्हणजे नेहमी फक्त पहिला येणे असे नसते,
एखादी गोष्ट पूर्वीपेक्षा जास्त चांगली करणे म्हणजेच जिंकणे होय!

दुपार विभाग – राजनंदिनी दळवी

उपमुख्यमंत्री – सकाळ विभाग – शरण्या जगदाळे
दुपार विभाग – विनया खामकर

निवडणूक निकालानंतर नवनिर्वाचित मंत्र्यांचा शपथविधी सोहळा पार पडला. नौपाडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माननीय श्री. सचिन दवणे यांनी सर्व मंत्र्यांना आपापल्या पदाची व कर्तव्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्याची शपथ दिली. नंतर त्यांना मुख्याध्यापकांच्या उपस्थितीत शिक्षकांकडून सन्मानपूर्वक बॅच प्रदान करण्यात आला.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. प्रत्यक्ष मतदानाचा अनुभव मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना लोकशाहीचे महत्त्व समजले अशा रीतीने हा उपक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

**आषाढी एकादशी**

शुक्रवार दि.२४ जुलै रोजी सकाळ व दुपार दोन्ही विभागात धार्मिक व सांस्कृतिक परंपरा जपणारा 'आषाढी एकादशी' उपक्रम अतिशय उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये 'महाराष्ट्राची भक्ती परंपरेची ओळख निर्माण करणे' व 'संतांचे विचार रुजवणे'हा या उपक्रमाचा उद्देश.



कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुखांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्तीचे पूजन व आरती करून झाली. शाळेतील विद्यार्थ्यांनी खांद्यावर पालखी व हाती टाळ व मृदंग घेऊन दिंडी काढली. शिक्षक वर्ग देखील यात उत्साहाने सामील झाला. दिंडी दरम्यान 'ज्ञानबा-तुकाराम' आणि 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' असा विठ्ठलाचा जयघोष केला. संपूर्ण शाळा परिसर टाळ्यांच्या आवाजाने आणि विठ्ठलाच्या गजराने दुमदुमून गेला काही विद्यार्थ्यांनी सुंदर अभंग आणि भजने गायली. तसेच नृत्य स्वरूपात सादर केली.

कार्यक्रमाच्या शेवटी साधना जोशी बाईंनी आषाढी एकादशीचे महत्त्व सांगणारे मार्गदर्शन केले. सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत हा सोहळा अतिशय आनंदाने पार पडला.

**गुरुपौर्णिमा**

२९ जुलै रोजी दुपार विभागामध्ये गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला. लेखिका, कवयित्री आणि अभिनेत्री असणाऱ्या मेघना साने आणि संगीत दिग्दर्शक, उत्तम गायक असणारे श्री. हेमंत साने हे दाम्पत्य यावेळी इ.५वी ते ७वी च्या विद्यार्थ्यांच्या गुरुपौर्णिमेच्या कार्यक्रमानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. यावेळी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. ७वी च्या विद्यार्थिनींनी केलं. सुरुवातीला ईशस्तवन झाल्यानंतर पाहुण्यांचा परिचय करून देण्यात आला. त्यांचं स्वागत मुख्याध्यापिका श्रीमती कल्पना वाघुले यांच्या हस्ते करण्यात आलं.





प्रतिनिधीक स्वरूपात इ.५वी, ६वी, ७वी च्या तुकड्यातून प्रत्येकी एका विद्यार्थ्याने गुरुपौर्णिमेबद्दल आपलं मनोगत व्यक्त केलं. त्यानंतर श्री. व सौ. साने

जीवनातील वाईट काळच दाखवून देते की; कोण हसतं, कोण दुर्लक्ष करतं, तर कोण सावरण्यासाठी येतं.

यांनी स्वरचित कविता, बालकविता यांचं गायन, शब्दांची गंमत आणि एक अतिशय हृदयस्पर्शी कथा सांगून विद्यार्थ्यांना गुंगवून ठेवलं. यावेळी पाहुण्यांनी सादर केलेल्या गाण्यांमध्ये विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला अतिशय रंजक पद्धतीने सादर झालेल्या या कार्यक्रमाने उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांची मने जिंकली.

**पर्यावरण दक्षता मंडळ**

पर्यावरण दक्षता मंडळ मार्फत दि. २९ जुलै रोजी इ. ७ वी अ, ब च्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतली. इ. ७ वी अ च्या विद्यार्थ्यांना ठाणे जिल्ह्यातील तलावांची माहिती तसेच तलाव वाचवण्यासाठी आपण काय करणे आवश्यक आहे. हे प्रोजेक्टरच्या सहाय्याने समजावून सांगितले. तसेच इ. ७वी ब च्या विद्यार्थ्यांसाठी कुंडी कशी भरावी याची माहिती प्रात्यक्षिकासह दिली.

**लोकमान्य टिळक पुण्यतिथी**

दि. १ ऑगस्ट रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त शाळेत विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने शाळेमध्ये दि. २९ जुलै रोजी इ. ५वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा तसेच वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या.




प्रत्येक इयत्तेमधून तीन विजेत्यांची निवड करण्यात आली. स्पर्धेनंतर दि.१ ऑगस्ट रोजी आयोजित कार्यक्रमासाठी आपल्याच शाळेचे माजी शिक्षक श्री. दीपक धोंडे सर प्रमुख पाहुणे लाभले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थी वयोगट लक्षात घेऊन लोकमान्य टिळकांविषयी गोष्टी आणि सद्य परिस्थितीत कसे वागायला हवे याचे मार्गदर्शन केले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आली. या प्रसंगी दुपार विभाग प्रमुख सौ. कुमावत, सौ. केदारे, श्री. कोल्हे उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना इतिहासाशी जोडता आले व त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली.

'ज्ञान प्रबोधिनी', ठाणे यांच्यातर्फे या वर्षी इ. ७वी अ च्या विद्यार्थ्यांसाठी महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शनिवारी वर्ग घेतला जात आहे.

**'इतिहास महाराष्ट्राचा' स्पर्धा**



बालरंग भूमी परिषद, ठाणे शाखा आणि मराठा मंडळ, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'इतिहास महाराष्ट्राचा' या स्पर्धेंतर्गत 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर' यांच्या चरित्रावर आधारित 'एकपात्री' कार्यक्रमाच्या प्रथम फेरीत कु. मुद्रा मंगेश दामले (५अ) या विद्यार्थिनीस द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले व पुढील फेरीसाठी ती पात्र ठरली.

## जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त)

**के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य वरिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रम**

- ५ जून २०२६: 'राष्ट्रीय सेवा योजना' (NSS) विभागामार्फत 'जागतिक पर्यावरण दिना' निमित्त (World Environment Day) जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालय परिसरातील प्रत्येकाने पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी जबाबदारी घ्यावी आणि हरित व निरोगी भविष्यासाठी योगदान द्यावे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.
- ६ जून २०२६ : 'राष्ट्रीय सेवा योजना' (NSS)

विभागामार्फत ‘शिवराज्याभिषेक सोहळा दिन’ साजरा करण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून शिवरायांचे आदर्श, त्यांचे अलौकिक नेतृत्व, शौर्य आणि राष्ट्रउभारणीतील त्यांचे योगदान याविषयी विद्यार्थ्यांमध्ये व्यापक जागरूकता निर्माण करण्यात आली.

- १५ जून २०२६: ‘राष्ट्रीय सेवा योजना’ (NSS) विभागामार्फत जागतिक रक्तदाता दिनानिमित्त (World Blood Donor Day) विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान करून लोकांचे प्राण वाचवण्याचे महत्त्व जनमानसात रुजवणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. या मोहिमेद्वारे ऐच्छिक (voluntary) रक्तदानाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, एनएसएसचे (NSS) मार्गदर्शक सहाय्यक प्राध्यापक शिवाजी नाईक आणि उपक्रम प्रमुख सुदाम अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम संपन्न झाला.

- २० जून २०२६: तत्त्वज्ञान विभाग, जिमखाना समिती, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग (DLLE) यांच्या संयुक्त विद्यमाने ‘आंतरराष्ट्रीय योग दिन’ साजरा करण्यात आला. डॉ. विजया खरे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना योगासनांचे प्रात्यक्षिक आणि सखोल मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संबंधित विभागांच्या सहकार्याने हा आंतरराष्ट्रीय योग दिनाचा कार्यक्रम पार पडला.

- २२ जून २०२६: ‘बँकिंग अँड इन्शुरन्स’ (BBI) विभागामार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘NEP ओरिएंटेशन प्रोग्राम’चे (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मार्गदर्शन सत्र) आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या, समन्वयक तथा एनईपी नोडल ऑफिसर डॉ. मृण्मयी थत्ते यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- २२ जून २०२६ : ‘फायनान्शियल मार्केट्स’ (BFM) विभागामार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘NEP ओरिएंटेशन प्रोग्राम’चे (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मार्गदर्शन सत्र) आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या, समन्वयक तथा एनईपी नोडल ऑफिसर डॉ. मृण्मयी थत्ते यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि उपप्राचार्या डॉ. मृण्मयी थत्ते यांच्या मार्गदर्शनाखाली हे ओरिएंटेशन सत्र संपन्न झाले.

- २५ जून २०२६ : ‘राष्ट्रीय सेवा योजना’ (NSS) विभागामार्फत समाजातील अंमली पदार्थांचे (narcotic drugs) घातक परिणाम आणि व्यसनमुक्तीविषयी जनजागृती करण्यासाठी विशेष पथनाट्याचे (Street Play on Anti-Narcotics) आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमाद्वारे अंमली पदार्थमुक्त समाजाचा (drug-free society) संदेश देत एकीकडे पोलिस ठाणे परिसरातील नागरिकांपर्यंत हा महत्त्वपूर्ण संदेश पोहोचवण्यात आला.

- २७ जून २०२६: Staff Academy तर्फे महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. डॉ. प्रियंवदा टोकेकर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त एका विशेष सत्कार व निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात त्यांच्या प्रेरणादायी शैक्षणिक प्रवासाचा, नेतृत्वाचा आणि संस्थात्मक विकासातील कटिबद्धतेचा गौरव करण्यात आला होता. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि स्टाफ अकॅडमीच्या अध्यक्षा डॉ. विमुक्ता राजे यांच्या मार्गदर्शनाखाली हा निरोप समारंभ संपन्न झाला.

- २९ जून२०२६: ‘बॅचलर ऑफ अकाउंटिंग अँड फायनान्स’ (BAF) विभागामार्फत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘ऑन द जॉब ट्रेनिंग’ (OJT) मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी बीएएफ (BAF) विभागाच्या समन्वयक डॉ. नीलम शेख यांनी

प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना उद्योग जगतातील प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्यापूर्वी त्या संदर्भातील सर्व नियमांची व जबाबदाऱ्यांची चांगली ओळख व्हावी, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

- २९ जून २०२६ : 'राष्ट्रीय सेवा योजना' (NSS) विभागामार्फत सी. आर. वाडिया रुग्णालयाच्या (C.R. Wadia Hospital) सहकार्याने 'पल्स पोलिओ' लसीकरण व जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले होत. या उपक्रमातून Not Me, But You हे एनएसएसचे ब्रीदवाक्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले. एनएसएसचे मार्गदर्शक सहाय्यक प्राध्यापक शिवाजी नाईक आणि उपक्रम प्रमुख सुरभी खरे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली.

- ३० जून २०२६: 'बीए इन मल्टी मीडिया अँड मास कम्युनिकेशन' (BAMMC) विभागामार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'NEP ओरिएंटेशन प्रोग्राम'चे (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण मार्गदर्शन सत्र) आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या, एनईपी नोडल ऑफिसर व बीएफएम आणि बीबीआय अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. मृण्मयी थत्ते तसेच उपप्राचार्य व बामएमसी विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

- १ जुलै २०२६: 'बॅचलर ऑफ अकाउंटिंग अँड फायनान्स' (BAF) विभागामार्फत 'सुगम कर व्यवस्था, सशक्त भारत' (Easy Tax System, Empowered India) या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये 'अनुभवात्मक शिक्षणाला' (Experiential learning) प्रोत्साहन दिले आणि 'सुगम कर व्यवस्था, सशक्त भारत' हा दृष्टिकोन रुजवला. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आणि बीएएफ (BAF) विभागाच्या समन्वयक डॉ. नीलम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

- ९ जुलै २०२६ : 'बॅचलर ऑफ आर्ट्स इन मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन' (BAMMC) विभागामार्फत तृतीय वर्षाच्या (TYBAMMC/MACJ) विद्यार्थ्यांसाठी मुंबई येथील 'विधान भवन', 'मुंबई मराठी पत्रकार संघ' आणि 'द मुंबई प्रेस क्लब' येथे एका विशेष शैक्षणिक अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अभ्यास दौऱ्यात संदीप चव्हाण, स्वाती घोसाळकर आणि मयूर गणपत्ये यांनी मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली.

- ९ जुलै २०२६ : राज्यशास्त्र (Political Science) विभागामार्फत विद्यार्थ्यांसाठी 'महाराष्ट्र विधान भवन' आणि 'संयुक्त महाराष्ट्र स्मृती दालन' येथे एका विशेष अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि राज्यशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. श्वेता अहिरे, सहाय्यक प्राध्यापक स्वप्नील मायेकर, सहाय्यक प्राध्यापक आशुतोष पाल व सहाय्यक प्राध्यापिका तनया वाणी यांच्या नेतृत्वाखाली हा अभ्यास दौरा संपन्न झाला.

- १० जुलै २०२६ : 'व्होकेशनल कोर्स इन सेल्स अँड मार्केटिंग मॅनेजमेंट' (B.Voc) विभागामार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'नेटीकेट' (Netiquette Quiz – ऑनलाईन संवाद शिष्टाचार) या विषयावर एका विशेष प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बी. व्होक (B.Voc) समन्वयक डॉ. अर्चना प्रभुदेसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपक्रम प्रमुख गौरी पांडे यांच्या नियोजनाखाली ही स्पर्धा संपन्न झाली.

- १० जुलै २०२६: 'आंतरिक गुणवत्ता हमी कक्षा'तर्फे (IQAC) 'आयक्यूएसी क्लस्टर' (IQAC

---

तुमच्यावर किती लोकं विश्वास ठेवतात किंवा ठेवत नाहीत; हे महत्त्वाचं नाही;
तर तुमचा स्वतःवर किती विश्वास आहे हे जास्त महत्त्वाचं आहे!

Cluster) यांच्या सहकार्याने प्राध्यापकांसाठी एका विशेष ऑनलाईन प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. 'आयक्यूएसी क्लस्टर'सोबत झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत (चेण) 'नॅक' (NAAC) मूल्यांकनाच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने या ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी पीयूष पहाडे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना ऑनलाईन माध्यमातून मार्गदर्शन केले. आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रज्ञा राजेबहाद्दूर यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण सत्र संपन्न झाले.

- ११ जुलै २०२६: इतिहास विभागामार्फत 'इन्स्टिटट्यूट फॉर ओरिएंटल स्टडी' (ठाणे) आणि 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' (CSMVS, मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने Museum on Wheels - Trunk Museum Exhibition या विशेष फिरत्या वस्तुसंग्रहालय प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. उपप्राचार्य व उपक्रम प्रमुख सहाय्यक प्राध्यापक अंकुर काणे आणि सहाय्यक प्राध्यापक साईश्रुती भट यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रदर्शन संपन्न झाले.

- १३ जुलै २०२६ : 'बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज' (BMS) विभागामार्फत द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Career Guidance Seminar on MBA : Empowering TYBMS Students for Future Success या विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ब्राइट वे (Bright Way) चे श्री. निकेतन तवरे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शनादरम्यान त्यांनी कॅट (CAT), सीईटी (CET), झॅट (XAT) आणि सीमॅट (CMAT) यांसारख्या विविध प्रवेश परीक्षांची रचना आणि परीक्षेच्या पूर्वतयारीची धोरणे यावर प्रकाश टाकला.

- १३ जुलै २०२६: 'बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज' (BMS) विभागामार्फत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी Career Guidance Seminar on MB-: Empowering TYBMS Students for Future Success या विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ब्राइट वे (Bright Way) चे श्री. निकेतन तवरे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शनादरम्यान त्यांनी कॅट (CAT), सीईटी (CET), झॅट (XAT) आणि सीमॅट (CMAT) यांसारख्या विविध प्रवेश परीक्षांची रचना आणि परीक्षेच्या पूर्वतयारीची धोरणे यावर सविस्तर प्रकाश टाकला.

- १३ जुलै २०२६: 'राष्ट्रीय सेवा योजना' (NSS) विभागामार्फत 'स्नेहा फाऊंडेशन' यांच्या सहकार्याने मतदार ओळखपत्र नोंदणी विषयावर विशेष प्रात्यक्षिक प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमाचे (Training of preparing Voter I'd) आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मेघा चौधरी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थांना प्रशिक्षण दिले.

- १३ जुलै २०२६ : 'कौशल्य विकास आणि उद्योजकता कक्ष' (Skill Development Entrepreneurship Cell) आणि 'बी. व्होक' (सेल्स आणि मार्केटिंग मॅनेजमेंट) विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक युवा कौशल्य दिन' निमित्त (World Youth Skill Day) एका विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मसाले क्षेत्रातील यशस्वी तरुण महिला उद्योजिका कु. शांभवी हातकमकर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- १३ जुलै २०२६: 'बॅचलर ऑफ आर्ट्स इन मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन' (BAMMC) विभागामार्फत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'ऑन द जॉब ट्रेनिंग' (OJT) अभिमुखता सत्राचे (Orientation Session) आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. संगीता मोहंती आणि डॉ. महेश पाटील उपस्थित होते. ओजेटी (OJT) उपक्रमाची उद्दिष्टे, त्याची रचना आणि मार्गदर्शक तत्त्वे याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

- १३ जुलै २०२६: 'वाणिज्य आणि एम. कॉम' (Department of Commerce and M. Com) विभागातर्फे चतुर्थ वर्ष ऑनर्स (Fourth-Year Honours) आणि एम. कॉम भाग-१ च्या (M. Com Part I) विद्यार्थ्यांसाठी 'ओरिएंटेशन कार्यक्रमाचे' (Orientation Programme) आयोजन करण्यात आले होते.

- १४ जुलै २०२६: 'बॅचलर ऑफ कॉमर्स (अकाउंटिंग अँड फायनान्स)' (B. Com. BAF) विभागामार्फत प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी 'ग्रंथालय अभिमुखता कार्यक्रम (Library Orientation Programme) आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे अधिकारी श्री. नारायण बारसे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक माहिती आणि संसाधनांचा प्रभावीपणे वापर कसा करावा, हे समजण्यास मदत झाली.

- १६ जुलै २०२६: राज्यशास्त्र विभागामार्फत 'प्रजा फाऊंडेशन' (Praja Foundation) यांच्या सहकार्याने 'शहरी सुशासनाचा दर्जा' (Status of Urban Governance) या विषयावर एका विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भारतातील शहरी सुशासनाच्या सद्यस्थितीबद्दल विद्यार्थांना अवगत करणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. प्रजा फाऊंडेशनच्या रिसर्च असोसिएट निलम मिराशी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- १८ जुलै २०२६ : राज्यशास्त्र (Political Science) विभागातर्फे Alumni Connect - माजी विद्यार्थी संवाद या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ओजस रानडे, समृद्धी घाडीगावकर, साक्षी पाटील आणि झवेरिया यांनी मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. 'मॉक इलेक्शन' (Mock Election) प्रक्रिया आणि तिच्या पद्धतींशी परिचित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

- १८ जुलै २०२६: 'बी.कॉम - अकाउंटिंग अँड फायनान्स' (BAF) विभागातर्फे प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी Budget to Banking : A Prelude to Bank Nationalization Day या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ चा बँकिंग क्षेत्रावरील प्रभाव आणि महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगणे, 'विकसित भारत' या संकल्पनेत बँकांची भूमिका स्पष्ट करणे हा उपक्रमाचा हेतू होता.

- २० जुलै २०२६: 'बँकिंग अँड इन्शुरन्स' (BBI) विभागामार्फत '५७ वा बँक राष्ट्रीयीकरण दिन' (57th Bank Nationalisation Day) विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या (FY, SY, TY B.Com Banking Insurance) विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

- २० जुलै २०२६: 'बॅचलर ऑफ आर्ट्स इन मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन' (BAMMC) विभागामार्फत प्रथम वर्षाच्या (FYBAMMC) विद्यार्थ्यांसाठी विशेष ग्रंथालय ओरिएंटेशन सत्राचे (Library Orientation Session) आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्राध्यापक नारायण बारसे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- २२ जुलै २०२६: 'स्पर्धा परीक्षा कक्षा'मार्फत (Competitive Examination Cell) 'सी. डी. देशमुख इन्स्टिट्यूट फॉर डमिनिस्ट्रेटिव्ह करिअर्स' (CDIAC) यांच्या सहकार्याने Mission Civil Services: UPSC MPSC Career Guidance या विषयावर विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सीडीआयएसीचे (CDIAC) संचालक श्री. महादेव जगताप आणि समन्वयक श्री. गिरीश झेंडे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

- २२ जुलै २०२६: 'बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज' (BMS) विभागातर्फे द्वितीय वर्षाच्या (SYBMS - HR) विद्यार्थ्यांसाठी "Is Training an Answer for Every Business Problem?" या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत डॉ. कांचन अक्षय यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

- २४ जुलै २०२६: 'बँकिंग अँड इन्शुरन्स' (BBI) विभागामार्फत प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या (FY SYBBI) विद्यार्थ्यांसाठी "The Advisor's Catalyst : Marketing and Sales Strategies for Insurance Professionals" या विषयावर एकदिवसीय 'व्ही.एस.सी कार्यशाळेचे' (VSC Workshop) आयोजन करण्यात आले होते. क्रिएटिव्ह इन्शुरन्स सर्व्हिसेसचे श्री. अभय कुलकर्णी यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- २५ जुलै २०२६: 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग' (Department of Lifelong Learning Extension - DLLE) मार्फत हावरे सिटी जवळील नॅशनल पार्क परिसरात वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. संगीता मोहंती यांनी प्रमुख मार्गदर्शक व शिक्षक प्रमुख म्हणून विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

- २९ जुलै २०२६ : 'फायनान्शियल मार्केट्स' (Department of Financial Markets - BFM) विभागातर्फे प्रथम वर्षाच्या (FYBFM) विद्यार्थ्यांसाठी विशेष ग्रंथालय ओरिएंटेशन सत्राचे (Library Orientation Session) आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्राध्यापक नारायण बारसे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- २९ जुलै २०२६ : एनईपी सप्ताह (NEP Week) अंतर्गत 'बॅचलर ऑफ आर्ट्स इन मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन' (BAMMC) विभागातर्फे Advertising शाखेच्या प्रथम वर्षाच्या (FYBAMMC) विद्यार्थ्यांसाठी 'पीअर लर्निंग क्टिव्हिटी'चे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये सहकार्यातून शिकण्याची वृत्ती, संवाद कौशल्य आणि विषयाची सखोल समज वाढवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

**कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रम :**

१५ जून २०२६ रोजी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षास प्रारंभ झाला. खालील उपक्रमांचे कनिष्ठ महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते.

- २३ जून २०२६ – इयत्ता ११ वी (कला वाणिज्य) शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी (orientation) दिशा निर्देशन करण्यात आले. शैक्षणिक वर्षातील अभ्यास, परीक्षा, व इतर विविध उपक्रम यांचे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. अंजली पुरंदरे, पर्यवेक्षक सौ. माधवी जोशी यांनी उपस्थित विदयार्थ्यांना शैक्षणिक अभ्यास पद्धत व परीक्षा पद्धत या विषयावर मार्गदर्शन केले.

- १० जुलै २०२६ – कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना व पर्यावरण समिती यांच्या वतीने महाविद्यालयात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व विदयार्थ्यांनी 'ईको क्लब पर्यावरण' सामूहिक प्रतिज्ञा घेतली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या अध्यक्षा डॉ. भावना देशमुख व श्री तुळशीराम जानकर यांचा सहभाग होता.

- १२ जुलै २०२६ – पालक शिक्षक समितीच्या वतीने इयत्ता १२ वी कला व वाणिज्य शाखेच्या पालकांसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य प्रा. सौ. अंजली पुरंदरे, पर्यवेक्षक प्रा. सौ. माधवी जोशी यांनी उपस्थित शैक्षणिक वर्षातील उपक्रम व बोर्ड परीक्षा पद्धत या विषयावर पालकांशी संवाद साधला. या बैठकीत पालक

ज्यांना खरं सांगितल्यावर राग येतो, त्यांची मनधरणी करत बसायचे नाही.

व विद्यार्थी यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. पालक-शिक्षक समितीच्या अध्यक्षा प्रा. नीलिमा पाटील यांनी या बैठकीचे आयोजन केले होते.

- १७ जुलै २०२६ - 'ऋतू हिरवा' या शीर्षकांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी नृत्य व संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

- सौ. नीलिमा पाटील व सौ. प्रणाली तरे या सह शिक्षकांच्या नेतृत्वाखाली ही स्पर्धा पार पाडली. इयत्ता १२ वी मधील २० स्पर्धकांचा सहभाग होता. संगीत स्पर्धेतील तीन विद्यार्थी व नृत्य स्पर्धेतील तीन विद्यार्थी पारितोषिक विजेते ठरले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या सौ. मनिषा ठाकूर यांनी परीक्षकांचे काम बघितले. उपप्राचार्य सौ. अंजली पुरंदरे व पर्यवेक्षक माधवी जोशी यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

- २१ जुलै २०२६ - इयत्ता ११वी १२वी च्या फ्रेंच भाषेच्या विदयार्थ्यांसाठी, फ्रेंच भाषेचा इतिहास, फ्रेंच भाषेतील क्रांती, करियर या विषयावर सौ. सायली वैद्य यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

- २५ जुलै २०२६ - राष्ट्रीय सेवा योजना व पर्यावरण समिती यांच्या वतीने उपवन येथील ज्येष्ठ रुग्णांच्या आनंदासाठी आषाढी वारी सांस्कृतिक कार्यक्रमाचे 'Sweet Home Geriatric Centre Upvan' ठाणे आयोजित करण्यात आले होते. कमिटीच्या अध्यक्षा डॉ. भावना देशमुख यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भजन, भक्तीगीते, भारूड, कथाकथन व विठ्ठल नामाचा गजर करून भक्तीमय वातावरण निर्माण केले. निवासी रुग्ण ज्येष्ठ नागरिकांनी या भक्तीयोगाचा आनंद घेतला. उपप्राचार्य सौ. अंजली पुरंदरे यांनी ज्येष्ठ नागरिकांना भेटवस्तू व फलाहार दिला.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त)

मुंबई विद्यापीठाच्या २० व्या 'आविष्कार' संशोधन अधिवेशनात बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाला 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप (प्रथम क्रमांक)' सन्मान प्राप्त.

महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये आयोजित केलेल्या २० व्या 'आविष्कार' आंतरमहाविद्यालयीन संशोधन अधिवेशनात मानव्यशास्त्र, भाषा व ललित कला विभागात 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप (प्रथम क्रमांक)' पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

हा सन्मान सुप्रसिद्ध रंगकर्मी मा. मकरंद देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) रवींद्र कुलकर्णी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. विद्या प्रसारक मंडळाने संशोधनाकरिता उपलब्ध करून दिलेले विविध स्रोत, नवनवीन गोष्टी करण्याकरिता दिलेला पाठींबा, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली तसेच आविष्कार संस्थात्मक समन्वयक डॉ. अभय एस. मोरजकर आणि त्यांच्या समितीने केलेले प्रभावी नियोजन व समन्वयामुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली.




### ग्रंथालय विभाग

दिनांक ०१.०७.२०२६ रोजी मा. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त मा. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस

पुष्पहार अर्पण केला. तसेच मा. वसंतराव नाईक यांच्यावरील माहितीचे तसेच पुस्तक प्रदर्शन भरविण्यात आले होते.



स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांनी ८ जुलै १९१० रोजी फ्रान्सच्या मार्सेलिस बंदरामध्ये एस. एस. मोरिया (S.S. Morea) या ब्रिटिश जहाजावरून समुद्रात मारलेली ऐतिहासिक आणि साहसी उडी ही ब्रिटिश साम्राज्याला हादरवून टाकणारी घटना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक मोठे साहस मानली जाते. स्वातंत्रवीर सावरकर यांनी केलेल्या या साहसी उडीचे स्मरण होण्याच्या दृष्टीने ८ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागामध्ये या घटनेबद्दलची माहिती व स्वातंत्रवीर सावरकर यांच्या कार्याबद्दलच्या माहितीचे आणि पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

दिनांक २३ जुलै २०२६ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती निमित्त महाविद्यालयाच्या लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. तसेच लोकमान्य टिळक यांच्यावरील माहितीचे आणि पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

दिनांक २५.०७.२०२६ रोजी ग्रंथालय विभाग, साहित्य सहवास आणि माझे ग्रंथालय ग्रंथपेटी योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारी – भक्तीचा अखंड प्रवास या विषयावर सौ. भारती जोशी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. आषाढी वारी ही महाराष्ट्राची अत्यंत महत्त्वाची आध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. या वारीमध्ये लाखो वारकरी (भक्त) टाळ–मृदुंगाचा गजर व माउलींच्या नामाचा जयघोष करत आषाढ शुद्ध एकादशीला विठ्ठल–रखुमाईच्या दर्शनासाठी पंढरपूरला पायी पोहोचतात, याचे सुंदर वर्णन सौ. भारती जोशी यांनी त्यांच्या व्याख्यानामध्ये केले. आषाढी वारीवर विविध लेखकांनी लिहिलेली पुस्तके, वारीतील अनुभव याबद्दल सौ जोशी यांनी संवाद साधला. यावेळी माझे ग्रंथालय या योजनेचे ९ सदस्य उपस्थित होते. या व्याख्यानानंतर माझे ग्रंथालय ग्रंथपेटी अदलाबदल कार्यक्रम संपन्न झाला. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर श्रीमती यामिनी पानगावकर यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**भौतिकशास्त्र विभाग**

दिनांक २९.०७.२०२६ रोजी भौतिकशास्त्र विभागातर्फे गुरुपौर्णिमा सोहळा आणि परदेशातील अध्यापनाच्या संधी या विषयावर माजी विद्यार्थ्यांचा संवाद भौतिकशास्त्र विभागामध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख वक्ता 'मिडलसेक्स युनिव्हर्सिटी युनायटेड किंगडम (UK) दुबई' या विद्याशाखाच्या नम्रता राजीब पाल, वरिष्ठ 'गणित आणि भौतिकशास्त्र विभाग' उपस्थित होत्या. यावेळी ५ प्राध्यापक व ५१ विद्यार्थी उपस्थित होते.

**पर्यावरणशास्त्र व ग्रीन क्लब'**

दिनांक २६.०७.२०२६ ते ३१.०७.२०२६ रोजी विज्ञान शाखेतील पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी, 'जैवविविधता, वन्यजीव संवर्धन आणि व्यवस्थापन' तसेच 'पर्यावरणशास्त्र व ग्रीन क्लब' या विभागामार्फत जागतिक खारफुटी दिनानिमित्त प्रश्नमंजुषा ऑनलाइन आयोजित करण्यात आली होती. या प्रश्नमंजुषेमध्ये ४१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग' (DLLE)**

दिनांक २६ जुलै २०२६ रोजी 'आजीवन अध्ययन व विस्तार विभाग' (DLLE) या विभागातर्फे जागतिक खारफुटी दिन साजरा करण्यात आला. खारफुटीचे पर्यावरणीय महत्त्व आणि किनारी भागातील जैवविविधता टिकवून ठेवण्यामधील त्यांची भूमिका यांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याकरिता खारफुटी या विषयावर 'ऑनलाईन भित्तिपत्र स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. या ऑनलाइन उपक्रमास एकूण २९ विद्यार्थी उपस्थित होते.

**'मानवी विज्ञान' आणि 'नैदानिक मानसशास्त्र' विभाग**

दिनांक ३१.०७.२०२६ रोजी 'मानवी विज्ञान' आणि 'नैदानिक मानसशास्त्र' या विभागातर्फे पतंजली सभागृहामध्ये चित्रपट दाखवण्यात आला. हा चित्रपट मानसशास्त्रीय विषयावरील विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणणे, तसेच चित्रपटात दाखवलेल्या आघात (ट्रॉमा) आणि 'डिसोसिएटिव्ह आयडेंटिटी डिसऑर्डर' (बहुव्यक्तिमत्त्व विकार) यांसारख्या मानसशास्त्रीय संकल्पनांवर त्यांना विचार करण्यास प्रवृत्त करणे.हा त्यामागील उद्देश होता. यावेळी १३० विद्यार्थी आणि प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर, सहाय्यक प्रा.देवंगी काळे, ऊर्जा भाटिया तसेच सिद्धांत प्रधान उपस्थित होते.

**गणित विभाग**

दिनांक २८.०७.२०२६ रोजी गणित विभागाच्या सिद्धांत क्लबचे उद्घाटन आणि डेटाकडून गणित काय शिकू शकते? या विषयावर प्रो.लेफ्टनंट प्रकाश संसारे, गणित विभागप्रमुख, बी. के. बिर्ला कॉलेज कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, कल्याण व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी एकूण ६ प्राध्यापक व ७१ विद्यार्थी उपस्थित होते.

**'राष्ट्रीय सेवा योजना'**

दिनांक २३.०७.२०२६ रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागातर्फे पतंजली सभागृहामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंतीनिमित्त लोकमान्य टिळक यांच्यावर आधारित चित्रपटाचे विशेष स्क्रिनिंग (प्रदर्शन) आयोजित केले होते. यावेळी ३ प्राध्यापक आणि ७४ विद्यार्थी उपस्थित होते.

**विद्यार्थी व शिक्षकांचे यश**



डॉ. जयदीप बाबासाहेब वाबळे, रसायनशास्त्र विभाग यांना विद्यावाचस्पती पदवी प्राप्त झाली. डॉ वाबळे यांनी डॉ. प्रज्ञा जे. प्रभू, प्राचार्या के. जे. सोमैया विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय विद्याविहार, मुंबई. यांच्या मार्गदर्शनाखाली "SYNTHESIS AND SCREENING OF 1, 2, 3 - TRIAZOLES CONTAINING FLAVONOID DERIVATIVES BY CLICK CHEMISTRY" या विषयावर प्रबंध सादर केला.

निलेश जवळकर :

१. यांची Open Access Journal of Zoological Sciences (OAJZS), Velnora Publishers, USA येथे संपादकीय मंडळावर निवड झाली आहे.

२. University of Mumbai मार्फत British Council Climate Skill Program - Phase II, Global Collaboration Grant (२०२६) अंतर्गत जिल्हानिहाय उपसमितीच्या कार्यगटांमध्ये मुख्य सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

३. मुंबई विद्यापीठातर्फे British Council Climate Skill Program साठी प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे.

**COOL CRYMB**

मुंबई विद्यापीठाद्वारे आयोजित आणि ब्रिटिश

भीती हे आपला मृत्यू थांबवत नाही; तर जीवन थांबवते.

कौन्सिल व एचएसबीसी (HSBC) यांच्या प्रायोजकत्वाखालील दुसरी 'कम्युनिटी को-क्रिएशन कार्यशाळा Community co-creation lab for Local Climate Resilience: Empowering Youth with Green Skills in Mumbai and Bristol (COOL CRYMB) या विषयावर नॅशनल सेंटर फॉर नॅनोसायन्स अँड नॅनोटेक्नॉलॉजी, विद्यानगरी, कलिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई येथे २७ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेस डॉ. नीलेश बी. जवळकर (सहाय्यक प्रा. प्राणीशास्त्र विभाग) आणि डॉ. स्वरूपा व्ही. अग्निहोत्री (सहाय्यक प्रा., वनस्पतिशास्त्र विभाग) हे प्राध्यापक आणि विठ्ठल विलास सावंत, इब्राहिम अश्राफक काझी, संस्कृती धनंजय पांचाळ, कौस्तुभ अनिल गायकवाड संजीवनी राजेंद्र सिंग हे विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून 'ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टा कम्युनिटी को-क्रिएशन लॅब' (CCL) शी हे प्राध्यापक आणि विद्यार्थी संबंधित आहेत.

## विद्या प्रसारक मंडळाचे<br>ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### तृतीय वर्ष विधी अभिमुखता (Orientation) कार्यक्रम : दिवाणी प्रक्रिया संहिता उलगडताना या विषयावरील व्यावहारिक कार्यशाळा

महाविद्यालयात तृतीय वर्ष एल.एल.बी.च्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक १ जुलै २०२६ रोजी त्यांच्या पाचव्या सत्राच्या प्रारंभानिमित्त अभिमुखता कार्यक्रम आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या विधी शिक्षणाच्या अंतिम वर्षाची सुरुवात सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरणात व्हावी, तसेच त्यांना नवीन सत्रातील अभ्यासक्रम, शैक्षणिक अपेक्षा, प्रात्यक्षिक प्रशिक्षण, परीक्षा पद्धती आणि भावी व्यावसायिक संधी यांची माहिती मिळावी, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करून करण्यात आली. या प्रसंगी अंतिम वर्षातील विधी शिक्षणाचे महत्त्व, नियमित उपस्थिती, न्यायालयीन प्रशिक्षण, इंटर्नशिप, कायदेविषयक संशोधन, न्यायालयीन शिष्टाचार, कायदेशीर मसुदालेखन, तसेच विविध शैक्षणिक व सहशैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. उत्कृष्ट कायदेपंडित आणि जबाबदार विधिज्ञ बनण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांचा विकास करण्याचे आवाहनही विद्यार्थ्यांना करण्यात आले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलचे सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल ॲड. गजानन चव्हाण यांचा सत्कार. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयातर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. हा सत्कार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी ॲड. चव्हाण यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचा गौरव केला आणि त्यांच्या अनुभवाचा व नेतृत्वाचा लाभ संपूर्ण विधी क्षेत्राला होईल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी विद्यार्थ्यांनाही या यशातून प्रेरणा घेऊन विधी व्यवसायात उत्कृष्ट कार्य करण्याचे आवाहन केले. सत्कारानंतर ॲड. गजानन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी आपल्या व्यावसायिक प्रवासातील अनुभव कथन करताना विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणा, नैतिक मूल्ये, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी या गुणांचे महत्त्व पटवून दिले. तसेच केवळ शैक्षणिक यशावर न थांबता व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. त्यानंतर "Cracking the Code of Civil Procedure" (दिवाणी प्रक्रिया संहिता उलगडताना) या विषयावरील विशेष व्यावहारिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे मार्गदर्शन मा. जिल्हा

न्यायाधीश (निवृत्त) श्री. सदाशिव देशमुख यांनी केले. न्यायव्यवस्थेतील त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे त्यांनी विद्यार्थ्यांना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (Code of Civil Procedure, 1908) या विषयाची अत्यंत सोप्या, व्यावहारिक आणि न्यायालयीन अनुभवांवर आधारित मांडणी केली. सैद्धांतिक ज्ञान आणि न्यायालयीन व्यवहार यांतील दरी कमी करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाजाची ओळख करून देणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेऊन ही कार्यशाळा २ जुलै २०२६ रोजीही पुढे सुरू ठेवण्यात आली. दुसऱ्या दिवशी दिवाणी खटल्याच्या संपूर्ण प्रक्रियेचे विविध टप्पे सविस्तरपणे स्पष्ट करण्यात आले. दिवाणी दावा दाखल करण्यापासून, अधिकारक्षेत्र (Jurisdiction), फिर्याद (Plaint), समन्स, लेखी जबाब (Written Statement), मुद्दे निश्चित करणे (Framing of Issues), अंतरिम दिलासा (Interim Reliefs), पुरावे नोंदविणे, निर्णय, अंमलबजावणी (Execution Proceedings), अपील प्रक्रिया आणि न्यायालयीन कामकाजातील विविध व्यावहारिक बाबींचे सखोल मार्गदर्शन करण्यात आले. मा. श्री. सदाशिव देशमुख यांनी आपल्या न्यायालयीन सेवेत आलेल्या अनेक अनुभवांच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रक्रिया कायद्याचे प्रत्यक्ष न्यायालयीन महत्त्व समजावून सांगितले. न्यायालयात प्रक्रिया कायद्याची अंमलबजावणी कशी केली जाते, विविध टप्प्यांवर कोणती काळजी घ्यावी लागते आणि यशस्वी वकिलीमध्ये प्रक्रिया कायद्याचे स्थान किती महत्त्वाचे आहे, याविषयी त्यांनी प्रभावी मार्गदर्शन केले. कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहाने सहभाग नोंदविला. त्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंका दूर करून घेतल्या. न्यायालयीन अनुभवांवर आधारित उदाहरणे, मसुदालेखनातील बारकावे आणि प्रत्यक्ष न्यायालयीन प्रक्रियेतील अडचणी यांवरील चर्चेमुळे विद्यार्थ्यांचे विषयावरील आकलन अधिक व्यापक झाले. या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या दिवाणी प्रक्रिया संहितेच्या सैद्धांतिक ज्ञानासोबतच व्यावहारिक ज्ञानातही लक्षणीय भर पडली. दोन्ही दिवस विद्यार्थ्यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यशाळेदरम्यान शिस्तबद्ध, उत्साही आणि जिज्ञासू सहभाग नोंदविला. विद्यार्थी आणि मार्गदर्शक यांच्यात झालेल्या संवादामुळे कार्यशाळा अत्यंत रंजक, ज्ञानवर्धक आणि प्रेरणादायी ठरली. दोन दिवस चाललेल्या या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक सत्रात स्वागत, विधी क्षेत्रातील उल्लेखनीय व्यक्तिमत्त्वाचा गौरव आणि न्यायालयीन अनुभवावर आधारित व्यावहारिक विधी शिक्षण ही तिन्ही उद्दिष्टे यशस्वीरीत्या साध्य झाली. कार्यक्रमाच्या शेवटी मा. जिल्हा न्यायाधीश (निवृत्त) श्री. सदाशिव देशमुख यांनी दिलेल्या बहुमूल्य मार्गदर्शनाबद्दल, ॲड. गजानन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रेरणादायी संदेशाबद्दल, प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या सततच्या प्रोत्साहन व सहकार्याबद्दल तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.



डॉ. विनोद एच. वाघ यांचा Career Advancement Scheme (CAS) अंतर्गत सहयोगी प्राध्यापक (Associate Professor) पदावर पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचाही महाविद्यालयात विशेष सत्कार करण्यात आला.



दिनांक १ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात पूर्णवेळ प्राध्यापिका डॉ. (सौ.)

चांदिनी गोघरे यांचा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवी यशस्वीरित्या संपादन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

६ जुलै २०२६ रोजी प्रथम वर्ष विधी व द्वितीय वर्ष विधीच्या प्रथम व चतुर्थ सत्राच्या पुनर्मूल्यांकनाचा निकाल जाहीर जाहीर करण्यात आला.

६ व ७ जुलै २०२६ रोजी अतिवृष्टीमुळे ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली.

१० जुलै २०२६ रोजी महाविद्यालयातील सर्व शिक्षकांनी पदोन्नतीसाठी स्व-मूल्यांकन अर्ज प्रादेशिक सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल यांच्याकडे सादर केला.

१० आणि ११ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयात प्रशासकीय अधिकारी लेखापरीक्षण करण्यासाठी प्रादेशिक सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल येथून आले होते.

मुंबई विद्यापीठाच्या एल.एल.एम. सत्र द्वितीय परीक्षा. ३, ८, १०, १५ जुलै रोजी घेण्यात आल्या. तसेच एल.एल.एम. सत्र प्रथम परीक्षा २१, २३, २७ व २९ जुलै रोजी घेण्यात आल्या.

**कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)**

१९ जुलै २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि प्राध्यापिका सौ. विद्या गायकवाड यांनी २२ विद्यार्थ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) विषयावरील परिसंवादास उपस्थिती दर्शवली. या परिसंवादाचे आयोजन ठाणे बार असोसिएशनतर्फे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी नुकत्याच निवडून आलेल्या बार कॉऊंसिलच्या तीन सदस्यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अखिलेश श्रीवास्तव आणि ॲड. सुब्रमण्यम वुथा हे या परिसंवादाचे प्रमुख मार्गदर्शक होते. परिसंवादाच्या समारोपाच्या सत्रात ॲड. गजानन चव्हाण, ॲड. जयभावे आणि ॲड. संग्राम देसाई यांनी संवादात्मक चर्चा घेतली. या चर्चेमुळे उपस्थितांना कायद्याच्या व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या वापराचे परिणाम, संधी आव्हाने यांचे सखोल आकलन झाले.



महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. रुपाली जामोडे यांनी MOOCs अंतर्गत आयोजित Mohammedan Law हा अभ्यासक्रम १०० पैकी ८४ गुण मिळवून यशस्वीरित्या पूर्ण केला. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल महाविद्यालयात त्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या भावी शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

**एल.एल.एम. आणि निकाल**

एल.एल.एम. प्रवेश - पहिली गुणवत्ता यादी २ जुलै रोजी प्रसिद्ध फौजदारी कायदा, व्यावसायिक कायदा, घटनात्मक आणि प्रशासकीय कायदा एकूण ६० पैकी ५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्या.

१८ जुलै २०२६ रोजी तृतीय विधी वर्ष विद्यार्थ्यांचे मूट कोर्ट (काल्पनिक न्यायालय) परीक्षा घेण्यात आल्या.

२८ जुलै २०२६ रोजी एल.एल.एम. चतुर्थ सत्र प्रबंध (Dissertation) व IDP सादर करण्याची अंतिम तारीख होती.

३० जुलै २०२६ रोजी मुंबई विद्यापीठाच्या द्वितीय सत्राचा निकाल जाहीर करण्यात आला.

डी एल एल ई (DLLE) प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रम आयोजक आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

(Department of Lifelong Learning and Extension - DLLE), मुंबई विद्यापीठ

मुंबई विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने (DLLE) जारी केलेल्या परिपत्रकानुसार, महाविद्यालयातील एक विस्तार कार्य शिक्षक (Extension Work Teacher) सहभागी सहाय्यक प्राध्यापक डॉ. चांदणी व्ही. घोगरे आणि श्री. सचिन दिलीप अहिरे – विद्यार्थी व्यवस्थापक (Student Manager), कु. अंजली देवानंद भगत – विद्यार्थी व्यवस्थापक (Student Manager). यांनी शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ साठी आयोजित करण्यात आलेल्या डीएलएलई प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदविला. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा उद्देश सुधारित डीएलएलई उपक्रम, कार्यपद्धती, आवश्यक दस्तऐवजीकरण, मूल्यमापन प्रक्रिया, तसेच अहवाल व नोंदी सादर करण्यासाठी नव्याने सुरू करण्यात आलेल्या ऑनलाइन पोर्टलविषयी सविस्तर मार्गदर्शन करणे हा होता. संलग्न महाविद्यालयांमध्ये डीएलएलई विस्तार कार्याची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी हा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात सहभागींच्या नोंदणीने झाली. त्यानंतर उद्घाटन सत्र पार पडले. उद्घाटन प्रसंगी व्ही. के. कृष्ण मेनन कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, भांडूप यांच्या प्राचार्या डॉ. प्रतिमा शिंग यांनी स्वागतपर व प्रास्ताविक भाषण केले. त्यांनी उपस्थित मान्यवर, विस्तार कार्य शिक्षक, विद्यार्थी व्यवस्थापक आणि संलग्न महाविद्यालयांतील सर्व सहभागींचे मनःपूर्वक स्वागत केले. आपल्या भाषणात त्यांनी उच्च शिक्षणातील विस्तार शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी समाजाभिमुख उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन सामाजिक उत्तरदायित्व आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधावा, असे प्रतिपादन केले. उद्घाटन समारंभास पुढील मान्यवर उपस्थित होते.

- डॉ. बाळीराम एन. गायकवाड – संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग (DLLE), मुंबई विद्यापीठ
- प्रा. कुणाल जाधव – आजीवन शिक्षण व विस्तार विभाग, मुंबई विद्यापीठ
- सौ. वैशाली जाधव – संसाधन व्यक्ती (Resource Person)
- श्री. चक्रधर श्रीधर – अधिष्ठाता (Dean), मुंबई विद्यापीठ

डॉ. बाळीराम एन. गायकवाड यांनी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाची उद्दिष्टे, ध्येय आणि कार्यदृष्टी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विस्तार शिक्षण हे वर्गातील शिक्षण आणि समाजसेवा यांमध्ये दुवा निर्माण करणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विस्तार शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करून महाविद्यालयांनी डीएलएलईचे उपक्रम प्रभावीपणे राबवावेत व विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा, असे आवाहन केले.

प्रा. कुणाल जाधव यांनी सुधारित डीएलएलई मार्गदर्शक तत्त्वे, विस्तार कार्य प्रकल्प, उपक्रमांचे नियोजन, दस्तऐवजीकरण प्रक्रिया, मूल्यमापन प्रणाली तसेच नव्याने सुरू करण्यात आलेल्या ऑनलाइन पोर्टलविषयी सविस्तर माहिती दिली. ऑनलाइन पद्धतीने अहवाल, उपस्थिती नोंदी आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करण्याची प्रक्रिया स्पष्ट करून विस्तार कार्य शिक्षक आणि विद्यार्थी व्यवस्थापक यांच्या जबाबदाऱ्यांचे स्पष्टीकरण केले.

सौ. वैशाली जाधव यांनी डीएलएलई उपक्रमांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसंदर्भातील विविध बाबींवर मार्गदर्शन केले. उपस्थिती नोंदवहीचे व्यवस्थापन, आवश्यक दस्तऐवजीकरण, विस्तार प्रकल्पांची अंमलबजावणी, अहवाल लेखन, तसेच सर्व शैक्षणिक प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

श्री. चक्रधर श्रीधर यांनी विस्तार शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संवाद कौशल्य, सामाजिक बांधिलकी आणि समाजाभिमुख दृष्टिकोन विकसित होतो, यावर भर दिला. विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन राष्ट्रनिर्माणात योगदान द्यावे, असे त्यांनी आवाहन केले.

प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये खालील विषयांचा समावेश होता:

- शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी सुधारित डीएलएलई विस्तार कार्य उपक्रम.
- विस्तार कार्य शिक्षक व विद्यार्थी व्यवस्थापक यांच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या.
- अहवाल व नोंदी सादर करण्यासाठी ऑनलाइन पोर्टलचा वापर.
- दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया आणि अधिकृत नोंदींचे व्यवस्थापन.
- विस्तार उपक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख.
- वार्षिक अहवाल तयार करण्याची पद्धत व मूल्यमापन प्रक्रिया.
- डीएलएलई उपक्रमांसाठी कार्यपद्धती व शैक्षणिक दिनदर्शिका.

या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे सहभागिंना पुढील बाबींची माहिती व कौशल्ये प्राप्त झाली :

- सुधारित डीएलएलई मार्गदर्शक तत्त्वे आणि कार्यपद्धती समजून घेता आली.
- ऑनलाइन दस्तऐवजीकरण व अहवाल सादरीकरणाविषयी व्यावहारिक ज्ञान प्राप्त झाले.
- विस्तार उपक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणीची कौशल्ये विकसित झाली.
- विस्तार कार्य शिक्षक आणि विद्यार्थी व्यवस्थापक यांच्यातील समन्वय अधिक दृढ झाला.
- सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण आणि समाजाभिमुख कार्याविषयी जागरूकता वाढली.
- दस्तऐवजीकरण, अहवाल लेखन आणि कार्यक्रम व्यवस्थापनाची कौशल्ये विकसित झाली.

डीएलएलई प्रथम सत्र प्रशिक्षण कार्यक्रम हा अत्यंत माहितीपूर्ण, संवादात्मक आणि व्यावसायिकदृष्ट्या उपयुक्त ठरला. शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील डीएलएलई विस्तार कार्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या कार्यपद्धती, ऑनलाइन दस्तऐवजीकरण, उपक्रमांचे नियोजन आणि समाजाभिमुख कार्य याबाबत या कार्यक्रमातून सखोल मार्गदर्शन मिळाले. प्रशिक्षणाद्वारे प्राप्त झालेले ज्ञान आणि कौशल्ये महाविद्यालयात विविध डीएलएलई विस्तार उपक्रमांचे प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरतील. कार्यक्रमाच्या समारोपावेळी सर्व सहभागींना सहभाग प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.



**ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिवांची ठाणे विधी महाविद्यालयाला भेट**

महाविद्यालयातील विधी सहाय्य केंद्रास ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश रवींद्र पाजनकर यांनी नुकतीच भेट दिली. या भेटीदरम्यान महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विधी साक्षरता व जनजागृती उपक्रमांची त्यांनी पाहणी केली. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार, तसेच उपप्राचार्य व विधी सहाय्य

केंद्राचे प्रभारी डॉ. विनोद एच. वाघ यांनी महाविद्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विधी साक्षरता उपक्रमांची माहिती दिली. महाविद्यालयामध्ये नागरिकांना मोफत विधी सल्ला दिला जात असून, शिक्षक व विद्यार्थी विविध ठिकाणी जाऊन कायदेविषयक जनजागृती आणि विधी साक्षरतेचे कार्यक्रम राबवित असल्याचे त्यांनी सांगितले. विधी सहाय्य केंद्राच्या कार्याची प्रशंसा करताना सचिव रवींद्र पाजनकर यांनी अशा उपक्रमांना ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सर्वतोपरी मार्गदर्शन व सहकार्य लाभेल अशी ग्वाही दिली. तसेच टीएमसी विधी महाविद्यालयाच्या विधी साक्षरता कार्याचे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती उदय यू. ललित यांनीही कौतुक केल्याची माहिती यावेळी देण्यात आली. ठाणे जिल्ह्यातील नागरिकांना कोणत्याही कायदेशीर विषयावर मार्गदर्शन किंवा सहाय्याची आवश्यकता असल्यास त्यांनी महाविद्यालयाच्या विधी सहाय्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या प्रसंगी प्रा. हेतल मिशेरी, डॉ. रुपाली जामोदे, प्रा. यतिन पंडित, प्रा. मनोज नाईक, डॉ. चंदणी घोगरे, प्रा. प्रेरणा वसावे, प्रा. पौर्णिमा बांद्री, तसेच अधिवक्ते आणि महाविद्यालयातील शिक्षकवृंद उपस्थित होते.



**महिला विकास कक्ष (WDC) यांच्यावतीने विधी सहाय्य कक्ष (Legal Aid Committee) यांच्या सहकार्याने समाजातील महिलांची सुरक्षा आणि गोपनीयता या विषयावरील कार्यशाळा :**

महाविद्यालयातील महिला विकास कक्ष (WDC) यांनी विधी सहाय्य कक्षाच्या (Legal Aid Cell) सहकार्याने दिनांक ३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता व्याख्यान कक्ष L11 येथे ''समाजातील महिलांची सुरक्षा आणि गोपनीयता'' या विषयावर जनजागृतीपर कार्यशाळेचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये महिलांचे कायदेशीर अधिकार, वैयक्तिक सुरक्षा, डिजिटल गोपनीयता, तसेच स्वसंरक्षणाच्या व्यावहारिक उपाययोजनांविषयी जागरूकता निर्माण करणे हा होता.

या कार्यशाळेचे समन्वयन डॉ. विनोद वाघ (विधी सहाय्य समन्वयक) व सौ. हेतल मेहेश्वरी (महिला विकास कक्ष प्रमुख) यांनी केले. तसेच प्राध्यापिका डॉ. रुपाली जामोडे व विद्यार्थी सदस्य कु. उज्वला म्हस्के यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमाची सुरुवात महिला विकास कक्षाच्या प्रमुख सौ. हेतल मेहेश्वरी यांनी स्वागतपर भाषणातून केली. त्यांनी आजच्या समकालीन समाजात महिलांच्या सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांचा सत्कार करण्यात आला. आपल्या प्रेरणादायी भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षित व सशक्त समाजाच्या निर्मितीसाठी सकारात्मक योगदान देण्याचे आवाहन केले. विधी सहाय्य समन्वयक डॉ. विनोद वाघ यांनी विधी विद्यार्थ्यांनी समाजात जनजागृती निर्माण करावी, अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा आणि सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन केले. प्राध्यापिका डॉ. रुपाली जामोडे आणि डॉ. चांदणी घोगरे यांनीही महिलांच्या सुरक्षिततेविषयी आपले विचार व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने चर्चेमध्ये सहभाग घेतला, तसेच सुरक्षित समाजाच्या निर्मितीसाठी आपली मते उत्स्फूर्तपणे मांडली.

माहितीपूर्ण सत्रानंतर श्री. सौरभ सावंत आणि श्री. दीपांकर खांबे, जे मार्शल आर्ट तज्ज्ञ आहेत, यांनी स्वसंरक्षण तंत्रांचे प्रात्यक्षिक (Live Demonstration) सादर केले. श्री. दीपांकर खांबे यांचा सत्कार डॉ. विनोद वाघ यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रात्यक्षिकादरम्यान सहभागी विद्यार्थ्यांनी आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचे संरक्षण करण्याच्या विविध व्यावहारिक पद्धती शिकल्या.

**''ड्रग फ्री मुंबई'' (नशामुक्ती जनजागृती अभियान) अंतर्गत आयोजित जनजागृती कार्यक्रम**

आजीवन शिक्षण व विस्तार विभाग (DLLE), विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे विधी महाविद्यालय, ठाणे यांच्या वतीने ड्रग फ्री मुंबई (नशामुक्ती जनजागृती अभियान) अंतर्गत आयोजित जनजागृती कार्यक्रमास महाविद्यालयातील १२ DLLE विद्यार्थी स्वयंसेवकांनी सहभाग ३० जुलै २०२६ रोजी नोंदविला. सदर कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी DLLE समन्वयक सहाय्यक प्राध्यापक डॉ. चांदणी व्ही. घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली भेट दिली. या कार्यक्रमासाठी श्रीमती कृष्णा कामत यांनीही सहकार्य केले.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश युवकांमध्ये वाढत्या अमली पदार्थांच्या व्यसनाबाबत जनजागृती करणे, व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्वीकार करण्यास प्रोत्साहित करणे तसेच समाजात व्यसनमुक्तीचा संदेश प्रभावीपणे पोहोचविणे हा होता. कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे सामाजिक, मानसिक, आरोग्यविषयक व कायदेशीर दुष्परिणाम यांची सविस्तर माहिती दिली. तसेच युवकांनी समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे ड्रग फ्री मुंबई शपथविधी होय. या शपथविधीत सर्व विद्यार्थी स्वयंसेवकांनी अमली पदार्थांपासून दूर राहण्याची, इतरांनाही व्यसनापासून परावृत्त करण्याची, तसेच आपल्या कुटुंबात, मित्रपरिवारात आणि समाजामध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्याची शपथ घेतली. या शपथेमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ झाली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीच्या चळवळीचे महत्त्व, अमली पदार्थांविरोधातील कायदेशीर तरतुदी, तसेच समाजात जागरूक नागरिक म्हणून कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांनी हा उपक्रम अत्यंत उत्साहाने व जबाबदारीने पूर्ण केला. सदर कार्यक्रम हा विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व सामाजिक भान विकसित करणारा ठरला.

महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागामार्फत (DLLE) राबविण्यात येणाऱ्या विस्तार उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नागरिकत्वाची जाणीव आणि समाजहिताची भावना दृढ करण्याच्या उद्दिष्टास या कार्यक्रमामुळे निश्चितच बळकटी मिळाली.




**परिविक्षाधीन (Probation) कालावधी यशस्वीरित्या पूर्ण**

सहाय्यक प्राध्यापक श्री. यतीन पंडित, डॉ. चांदणी घोगरे, डॉ. रुपाली जमोडे, सौ. प्रेरणा वसावे आणि श्री. शिवाजी बिबे यांनी दिनांक १ ऑगस्ट २०२६ रोजी आपला परिविक्षाधीन (Probation) कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला. तसेच, सहाय्यक प्राध्यापक श्री. मनोजकुमार नाईक यांचा परिविक्षाधीन कालावधी दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी पूर्ण होणार आहे.



महाविद्यालयाच्या कार्यालय अधीक्षिका सौ. रंजन अनिल करंदीकर या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ व समर्पित सेवेनंतर दिनांक ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल आम्ही मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो आणि त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद व सर्व भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देतो.

## विद्या प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालय

### ऑटोमेशन आणि रोबोटिक्स अभियांत्रिकी विभाग ISA विद्यार्थी अध्यायाचा उद्घाटन समारंभ

महाविद्यालयाच्या इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ऑटोमेशन (ISA) विद्यार्थी अध्यायाचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, २४ जुलै २०२६ रोजी पाणिनी सभागृह, Dr. VNBRIMS, ठाणे येथे यशस्वीपणे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमामुळे ऑटोमेशन आणि रोबोटिक्स अभियांत्रिकी विभागासाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला. विद्यार्थ्यांना नामवंत उद्योग व्यावसायिक, शिक्षणतज्ज्ञ आणि ISA पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची उत्कृष्ट संधी या कार्यक्रमातून मिळाली. या कार्यक्रमास एकूण १२० विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी उपस्थित पाहुणे आणि सहभागींची नोंदणी दुपारी २:४५ वाजता सुरू झाली आणि त्यानंतर दुपारी ३:०० वाजता औपचारिक उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे कुशल सूत्रसंचालन TE Automation and Robotics चे विद्यार्थी कुमार सोहम बेलोसे आणि कुमारी अनुश्री पेडणेकर यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञान आणि बुद्धीची देवता सरस्वतीचे आशीर्वाद घेण्यासाठी सरस्वती वंदनेने झाली. त्यानंतर सर्व मान्यवर पाहुणे, प्रतिष्ठित व्यक्ती, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले.

स्वागतपर भाषण ISA च्या विद्यार्थी मार्गदर्शक प्राध्यापक सौ. स्मिता खंडागळे यांनी केले. त्यांनी तांत्रिक शिक्षण, व्यावसायिक नेटवर्किंग आणि करिअर विकासाला चालना देण्यासाठी ISA विद्यार्थी अध्यायाचे महत्त्व अधोरेखित केले. ऑटोमेशन आणि रोबोटिक्स अभियांत्रिकी विभागाच्या विभागप्रमुख सौ. वैशाली जोशी यांनी ISA विद्यार्थी अध्यायाचा प्रवास आणि विद्यार्थ्यांना उद्योगजगत, तसेच व्यावसायिक संस्थांशी जोडण्याच्या विभागाच्या दृष्टीकोनाविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमास डॉ. दत्तात्रय सावंत, श्री. चंद्रशेखर लिमये, श्री. वैभव नारकर, श्री. संदीप राठी आणि प्रा. विक्रांत जोशी हे मान्यवर उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांनी ISA विद्यार्थी अध्यायाचा इतिहास आणि त्याचे पुनरुज्जीवन याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी या व्यासपीठाचा उपयोग आपले तांत्रिक ज्ञान, नेतृत्वगुण आणि व्यावसायिक कारकीर्द विकसित करण्यासाठी करावा असे आवाहन केले.

ISA महाराष्ट्र सेक्शनचे वरिष्ठ सदस्य आणि VEGA India Level Pressure Measurement Pvt. Ltd. येथे Market Analyst Strategist म्हणून कार्यरत असलेले श्री. वैभव नारकर यांनी विद्यार्थ्यांना ISA, त्याची जागतिक स्तरावरील उपस्थिती, उद्दिष्टे आणि सदस्यत्वाचे फायदे यांची माहिती दिली. त्यांनी नेटवर्किंग, सातत्यपूर्ण शिक्षण आणि मार्गदर्शक-विद्यार्थी संबंधांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी 'Connect together and grow yourself' हा प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांना दिला.

Omnidirectional Spherical Robot या विषयावर तांत्रिक सत्र डॉ. दत्तात्रय सावंत यांनी घेतले. ते ISA महाराष्ट्र सेक्शनचे सचिव, ISA USA चे Geographic Assembly Chair आणि Mechatronics विषयाचे सहाय्यक प्राध्यापक आहेत. त्यांनी प्रगत रोबोटिक हालचाल तंत्रज्ञान, औद्योगिक उपयोग, संशोधन कार्य, प्रकाशने आणि रोबोटिक्स व ऑटोमेशन क्षेत्रातील पेटंटेड नवकल्पना याबाबत विद्यार्थ्यांना मौल्यवान माहिती दिली.

Vivekanand Education Society's Polytechnic चे प्राचार्य प्रा. विक्रांत जोशी यांनी विद्यार्थ्यांना जिज्ञासूवृत्ती कायम ठेवण्याचे, सतत नवीन गोष्टी शिकण्याचे आणि व्यावसायिक संस्थांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. ISA महाराष्ट्र सेक्शनचे कार्यकारी समिती सदस्य आणि Sierra Instrumentation Controls चे Founder CEO श्री. संदीप राठी यांनी अभियांत्रिकीच्या मूलभूत संकल्पना, व्यावहारिक ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभवाचे महत्त्व स्पष्ट केले. ISA महाराष्ट्र सेक्शनचे कार्यकारी समिती सदस्य आणि Supertech Instrumentation Services (India) Pvt. Ltd. चे Chairman Managing Director श्री. चंद्रशेखर लिमये यांनी आपल्या व्यावसायिक प्रवासाविषयी माहिती दिली आणि विद्यार्थ्यांनी मजबूत तांत्रिक पाया विकसित करावा, व्यावसायिक नीतिमूल्ये जपावीत आणि आजीवन शिक्षणासाठी कटिबद्ध राहावे, असे मार्गदर्शन केले.



Student Section Charter presentation by ISA International Chairman Mr. David J. Morrow in photo L to R.
Mr. Santosh Kumar, Mr. Ramdas Kisandas, Mr. C. S. Limaye, Mr. Milind Chudhari, Mr. David J. Morrow, Mr. D. K. Nayak & Mr. Willam Calder.

**ISA Student Section Charter in 1991**



**ISA Student Chapter Charter in 2026**

महाविद्यालयाचा इंटरनॅशनल सोसायटी ऑफ ऑटोमेशन (ISA) सोबतचा गौरवशाली संबंध १९९१ पासूनचा आहे. त्या वेळी या संस्थेला Instrument Society of America म्हणून ओळखले जात होते. त्या काळात श्री. चंद्रशेखर लिमये सरांनी ISA विद्यार्थी सनद (ISA Student Charter) सुपूर्द केली होती, ज्यामुळे महाविद्यालयाच्या ISA सोबतच्या संबंधातील एक महत्त्वाचा टप्पा अधोरेखित झाला. आज, ISA विद्यार्थी अध्यायाच्या उद्घाटनाद्वारे हा गौरवशाली वारसा पुन्हा जिवंत करताना महाविद्यालयाला आनंद होत आहे. श्री. चंद्रशेखर लिमये सरांनी ISA विद्यार्थी सनद प्राचार्य डॉ. डी. के. नायक, विभागप्रमुख सौ. वैशाली जोशी, ISA विद्यार्थी मार्गदर्शक प्राध्यापक सौ. स्मिता खांडागळे आणि विद्यार्थी समन्वयक यांच्याकडे औपचारिकरित्या सुपूर्द केली. या पुनरुज्जीवनामुळे विद्यार्थ्यांना शिकणे, नवकल्पना करणे, उद्योगजगताशी जोडले जाणे आणि ऑटोमेशन तसेच उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते ISA विद्यार्थी अध्यायाच्या पदाधिकाऱ्यांचा पदस्थापना समारंभ पार पडला. डॉ. दत्तात्रय सावंत आणि उपस्थित मान्यवरांनी नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांचे ISA परिवारात स्वागत केले. नवनियुक्त पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत: कुमारी तन्वी वाळेकर – अध्यक्ष, कुमारी प्राची कुलकर्णी – सचिव, कुमारी पूजा शिंदे – सचिव आणि कुमार देवदास जोशी – खजिनदार. डॉ. सावंत यांनी ISA सदस्यत्व नोंदणी प्रक्रियेची माहिती देऊन विद्यार्थी

सदस्यत्वाचे फायदे स्पष्ट केले. एकूण ४३ विद्यार्थ्यांनी ISA विद्यार्थी सदस्यत्वासाठी नोंदणी केली.

कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. त्यानंतर राष्ट्रगीत आणि मान्यवर, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांसोबत सामूहिक छायाचित्र घेण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप सुमारे सायंकाळी ५:०० वाजता झाला आणि त्यानंतर अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली.

एकूणच, हा उद्घाटन समारंभ अत्यंत माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि यशस्वी ठरला. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची मौल्यवान संधी मिळाली, व्यावसायिक नेटवर्किंगला प्रोत्साहन मिळाले आणि तांत्रिक, तसेच संशोधनविषयक उपक्रमांमध्ये सक्रियसहभाग घेण्यासाठी प्रेरणा मिळाली. ISA विद्यार्थी अध्यायाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, तांत्रिक, नेतृत्वविषयक आणि व्यावसायिक विकासासाठी एक भक्कम पायाभरणी झाली आहे.

**अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी**

भारतीय संस्कृतीमध्ये गुरूचे स्थान अत्यंत श्रेष्ठ मानले जाते. आपल्या जीवनाला योग्य दिशा देणारी, अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारा व्यक्ती म्हणजे गुरू होय. अशा गुरूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. गुरुपौर्णिमेला 'व्यास पौर्णिमा' असेही म्हटले जाते. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी वि. प्र. मंडळाचे, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ग्रंथालय आणि माहिती केंद्रातर्फे दिनांक २९ जुलै २०२६ रोजी गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

सदर दिवशी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक यांचे शुभहस्ते प्रथम भारतीय ग्रंथालय आणि माहितीशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. आणि रामचरितमानस, ज्ञानेश्वरी, दासबोध, नामदेवगाथा आणि इतर नामवंत ग्रंथाचे पूजन करण्यात आले. प्रसंगी डॉ. गीताली इंगवले, श्री. चंद्रकांत शिंगाडे, प्रा. स्मिता खंडागळे, सौ. प्रज्ञा दळवी, सौ. मनाली आजीवले कार्यालयीन स्टाफ सौ. रुपाली काणे, मृणाल कोळी, सौ. क्रांती बस्तव आणि बहुसंख्ये विद्यार्थी उपस्थित होते.

सर्व विद्यार्थानी गुरू प्राचार्य सरांना गुलाबपुष्प देऊन आशीर्वाद घेतले. सदर गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून नियमित अभ्यास करणे, शिक्षकांचा आदर करणे, चांगले संस्कार आत्मसात करणे, वेळेचे महत्त्व ओळखणे, आणि समाजासाठी उपयुक्त नागरिक बनणे इत्यादी संकल्प विद्यार्थानी केले. सद्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग मानले जाते. इंटरनेटच्या माध्यमातून ज्ञान हे आता सहज उपलब्ध होत आहे. तथापि, तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी प्रत्यक्ष गुरूचे महत्व कमी होऊ शकत नाही. कारण गुरू केवळ माहिती देत नाहीत तर प्रेरणा, अनुभव आणि योग्य दिशादेखील देतात. म्हणूनच गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरूंचा मनापासून सन्मान करणे आणि त्यांच्या शिकवणुकीचे पालन करणे होय. शेवटी सर्व उपस्थितांना केळी आणि चॉकलेटचे वाटप केले.




पुष्पहार अर्पण करताना प्राचार्य डॉ. दि. कृ. नायक आणि उपस्थित सहकारी आणि विद्यार्थी......

**प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल आणि संगणक अभियांत्रिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर मार्गदर्शन विषयावरील अतिथी व्याख्यान**

प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल आणि संगणक अभियांत्रिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३० जुलै २०२६ रोजी वर्ग क्रमांक १९ येथे 'करिअर मार्गदर्शन' या विषयावर

अतिथी व्याख्यानाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना सध्याच्या औद्योगिक क्षेत्रातील बदलते प्रवाह, रोजगाराच्या संधी आणि भविष्यातील करिअर नियोजन याबाबत मार्गदर्शन करणे हा होता.

या कार्यक्रमासाठी NIIT, डोंबिवली येथील पाच अनुभवी तज्ज्ञांच्या टीमने मार्गदर्शन केले. या टीममध्ये ब्रँच मॅनेजर, प्लेसमेंट ऑफिसर आणि प्रशिक्षक यांचा समावेश होता. तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना आजच्या स्पर्धात्मक युगातील रोजगाराच्या संधी, उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा आणि प्लेसमेंट प्रक्रियेतील आवश्यक कौशल्यांची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे समन्वयन सौ. सौम्या स्वामी आणि सौ. गौतमी ए. पुजारे यांनी केले. या व्याख्यानास तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी शाखेचे ४५ विद्यार्थी, तसेच २ प्राध्यापक, असे एकूण ४७ जण उपस्थित होते.

व्याख्यानामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) आणि डेटा सायन्समधील करिअरच्या संधी, इंटर्नशिप, उद्योगमान्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम (Certifications), प्रभावी बायोडेटा (Resume) तयार करण्याच्या पद्धती, LinkedIn प्रोफाइल विकसित करण्याचे महत्त्व, Aptitude चाचणीची तयारी, संवाद कौशल्ये (Communication Skills), तसेच मुलाखतीत यश मिळविण्यासाठी आवश्यक रणनीती याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, करिअर नियोजन, प्लेसमेंटची तयारी आणि व्यावसायिक विकास यासंदर्भातील विविध शंकांचे समाधानकारक निरसन करून देण्यात आले.

विद्यार्थ्यांनी या संवादात्मक सत्रामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि तज्ज्ञांशी थेट संवाद साधून आपल्या करिअरविषयक शंका विचारल्या. सत्र अत्यंत माहितीपूर्ण, प्रेरणादायी आणि विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरले.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना सध्याच्या औद्योगिक प्रवाहांची आणि करिअरच्या विविध संधींची सखोल माहिती मिळाली. प्लेसमेंट प्रक्रिया आणि नियोक्त्यांच्या अपेक्षा यांची स्पष्ट समज निर्माण झाली. प्रमाणपत्र अभ्यासक्रम, इंटर्नशिप आणि नावीन्यपूर्ण प्रकल्प करण्याची प्रेरणा मिळाली. प्रभावी बायोडेटा तयार करणे, LinkedIn प्रोफाइल विकसित करणे आणि मुलाखतीची तयारी याविषयीचे ज्ञान वाढले. तसेच विद्यार्थ्यांना तृतीय वर्षापासूनच प्लेसमेंटची नियोजनबद्ध तयारी सुरू करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले.




हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून, त्यांच्या व्यावसायिक आयुष्याची दिशा निश्चित करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन देणारा ठरला. संगणक अभियांत्रिकी विभाग आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल यांच्या अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास, उद्योगसिद्ध कौशल्ये विकसित होण्यास आणि उज्ज्वल करिअर घडविण्यास निश्चितच मदत होणार आहे.

**दिनांक ३० जुलै २०२६ – करिअर मार्गदर्शनावरील अतिथी व्याख्यानाचा अहवाल**

विद्युत अभियांत्रिकी विभागाने, प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सेलच्या सहकार्याने, विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी शोधण्यात आणि त्यांच्या व्यावसायिक प्रवासासाठी तयार होण्यास मदत करण्याच्या उद्देशाने विद्युत अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन केले.

हे सत्र डॉ. कविता पांडे यांनी घेतले. त्या एक

अनुभवी शिक्षणतज्ज्ञ आणि प्रमाणित करिअर समुपदेशक असून, मुंबई विद्यापीठाच्या 'अल्केश मोदी इन्स्टिट्यूट फॉर फायनान्शियल अँड मॅनेजमेंट स्टडीज'मध्ये सहाय्यक प्राध्यापक तसेच प्रशिक्षण आणि नियुक्ती अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगच्या पदवीधरांसाठी मुख्य उद्योगक्षेत्र, सार्वजनिक क्षेत्रातील संस्था, अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, ऑटोमेशन, उच्च शिक्षण, संशोधन आणि उद्योजकता यांसारख्या विविध क्षेत्रांत उपलब्ध असलेल्या करिअरच्या संधींविषयी मोलाची माहिती दिली.

विद्यार्थ्यांना त्यांच्या सामर्थ्यांची ओळख पटवून देण्यासाठी, आत्म-जागरूकता वाढवण्यासाठी आणि प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करण्यासाठी एक संवादात्मक 'जोहरी विंडो क्टिव्हिटी' आयोजित करण्यात आली होती. डॉ. पांडे यांनी नेटवर्किंग आणि करिअरच्या वाढीसाठी व्यावसायिक लिंक्डइन प्रोफाइल तयार करण्याच्या महत्त्वावरही भर दिला. या सत्रात 'रिझ्युमे' लेखनाबाबत व्यावहारिक मार्गदर्शन करण्यात आले; यामध्ये विद्यार्थ्यांनी प्रभावी आणि अस्सल रिझ्युमे कसा तयार करायचा, हे शिकून घेतले. हे व्याख्यान अत्यंत माहितीपूर्ण आणि परस्परसंवादी होते; यामुळे विद्यार्थ्यांना त्यांची तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्ये निरंतर विकसित करण्याची प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांच्या भविष्यातील करिअरच्या नियोजनासाठी अत्यंत उपयुक्त ठरलेले मौल्यवान मार्गदर्शन आणि प्रेरणादायी सत्र दिल्याबद्दल, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग विभाग डॉ. कविता पांडे यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

**प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल आणि संगणक अभियांत्रिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित I-Medita, Baner, Pune येथे औद्योगिक भेट (Industrial Visit)**

प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल आणि संगणक अभियांत्रिकी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ०७ ऑगस्ट २०२६ रोजी तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी I-Medita, Baner, Pune येथे औद्योगिक भेटीचे (Industrial Visit) यशस्वी आयोजन करण्यात आले. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना नेटवर्किंग व सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील प्रत्यक्ष औद्योगिक वातावरणाची ओळख करून देणे, तसेच उद्योगात वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देणे हा होता.

I-Medita ही Cisco Registered Partner असलेली आणि ISO 9001:2008 प्रमाणित आयटी नेटवर्किंग व सायबर सिक्युरिटी प्रशिक्षण कंपनी असून, महाराष्ट्रातील सर्वांत मोठ्या Cisco नेटवर्किंग लॅबसाठी ओळखली जाते. Cisco CCNA, CCNP, CCIE तसेच Checkpoint, Palo Alto, F5 Load Balancer आणि Cloud Computing (AWS, Azure, GCP) यांसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण येथे दिले जाते. या औद्योगिक भेटीचे समन्वयन संगणक अभियांत्रिकी विभागाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलअंतर्गत सौ. सौम्या स्वामी यांनी केले. या भेटीसाठी तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी शाखेचे एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना I-Medita च्या अत्याधुनिक Cisco नेटवर्किंग लॅबची पाहणी घडवून आणण्यात आली, जिथे Cisco Routers, Switches, Firewalls यांसारख्या उपकरणांची प्रत्यक्ष ओळख करून देण्यात आली. तसेच नेटवर्क सिक्युरिटी, इथिकल हॅकिंग, क्लाउड कॉम्प्युटिंग आणि उद्योगमान्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमांबाबत तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना नेटवर्किंग व सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील करिअर संधी, आवश्यक कौशल्ये आणि उद्योगाच्या अपेक्षांबाबतही माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी या सत्रामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि तज्ज्ञांशी थेट संवाद साधून आपल्या तांत्रिक शंकांचे निरसन करून घेतले. सत्र अत्यंत माहितीपूर्ण व विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरले.

या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना नेटवर्किंग व

सायबर सिक्युरिटी क्षेत्रातील प्रत्यक्ष औद्योगिक कार्यपद्धतीची सखोल माहिती मिळाली. तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि करिअर संधींबाबत स्पष्टता निर्माण झाली. ही भेट विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानवृद्धीसाठी तसेच व्यावसायिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरली.

हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या करिअर विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून, संगणक अभियांत्रिकी विभाग आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल यांच्या अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढण्यास आणि उद्योगसिद्ध कौशल्ये विकसित होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

**ऑटोमेशन आणि रोबोटिक्स विभाग**

**सर्वसमावेशक कामगिरी अहवाल : 'आयरन वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप'मध्ये ऐतिहासिक सुवर्णपदकाची कमाई**

**विद्यार्थी प्रोफाइल आणि शैक्षणिक तपशील**

खेळाडूचे नाव : राज लवंडे

शैक्षणिक संस्था : विद्या प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, ठाणे

विभाग : ऑटोमेशन आणि रोबोटिक्स अभियांत्रिकी

शैक्षणिक वर्ष : तिसरे वर्ष (TEAR)

प्रतिनिधित्व केलेला देश : भारत

**कार्यक्रमाचा आढावा**

स्पर्धा : आयर्न वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२६

मान्यताप्राप्त शीर्षक: वर्ल्ड स्ट्रॉन्गमेन ज्युनियर

कार्यक्रमाची तारीख: १३ जून २०२६

यजमान स्थळ: AIB, बँकॉक, थायलंड

स्पर्धेची व्याप्ती : १८ देशांचा सहभाग

**स्पर्धेतील वर्गीकरण आणि निकाल**

वजन गट: ५२ किलो (ज्युनियर)

SBD (स्क्वॉट, बेंच, डेडलिफ्ट – पूर्ण स्पर्धा) : सुवर्णपदक

केवळ स्क्वॉट स्पर्धा: सुवर्णपदक

केवळ बेंच प्रेस स्पर्धा: सुवर्णपदक

केवळ डेडलिफ्ट स्पर्धा: सुवर्णपदक

पुश-पुल स्पर्धा: सुवर्णपदक

एकूण पदके: ५ सुवर्णपदके

**कार्यकारी सारांश आणि ऐतिहासिक टप्पे**

**बँकॉक येथे जागतिक वर्चस्व –** १३ जून २०२६ रोजी, राज लवंडे याने थायलंडमधील बँकॉक येथे आयोजित 'आयरन वर्ल्ड पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप'मध्ये भारताचे अधिकृतपणे प्रतिनिधित्व केले. १८ देशांतील उत्कृष्ट खेळाडूंचा सहभाग असलेल्या अत्यंत चुरशीच्या ५२ किलो 'ज्युनियर' गटात स्पर्धा करताना राजने निर्दोष कामगिरी केली. त्याने 'फुल एसबीडी' (Full SBD) मीट, 'स्क्वॉट ओन्ली', 'बेंच प्रेस ओन्ली', 'डेडलिफ्ट ओन्ली' आणि 'पुश-पुल' अशा सर्व स्पर्धा प्रकारांमध्ये सुवर्णपदके जिंकून निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले.

**भारतासाठी ऐतिहासिक कामगिरी –** या निर्विवाद विजयासह राजने प्रतिष्ठित 'वर्ल्ड स्ट्रॉन्गमेन ज्युनियर' (World Strongmen Junior) किताब पटकावला. क्रीडा इतिहासात एखाद्या भारतीय खेळाडूने हा विशिष्ट आंतरराष्ट्रीय किताब जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे.

**राज्यस्तरीय मान्यता आणि नामांकन –** आंतरराष्ट्रीय स्तरावरील अभूतपूर्व यश आणि देशाला मिळवून दिलेला जागतिक लौकिक यांच्या सन्मानार्थ, राज लवंडे यांना 'शिव छत्रपती पुरस्कारा'साठी अधिकृतपणे नामांकन मिळाले आहे. हा महाराष्ट्र राज्य सरकारतर्फे दिला जाणारा सर्वोच्च क्रीडा सन्मान आहे.

**संस्थात्मक प्रभाव –** ऑटोमेशन अँड रोबोटिक्स इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमाचा खडतर अभ्यास सांभाळत जागतिक क्रीडा क्षेत्रात आपले वर्चस्व गाजवण्याची राजची क्षमता प्रेरणादायी आहे. त्याचे यश हे सर्वोच्च शारीरिक शिस्त आणि विश्लेषणात्मक समर्पणाचे उत्तम उदाहरण आहे.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

३ जुलै २०२६ : डॉ. महेश भानुशाली यांनी २०२४–२६ तुकडीच्या खालील ६ विद्यार्थ्यांना, सुप्रसिद्ध ब्रँड–टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) येथे व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी–वार्षिक ६ लाख रुपयांच्या वेतना सह यशस्वीरीत्या नियुक्ती सहकार्य केले.

१. अवनीश प्रजापती, एमएमएस फायनान्स

२. हर्षदा भंडारे, एमएमएस फायनान्स

३. शुभम सुरसे, एमएमएस फायनान्स

४. अनुष्का गायकवाड, एमएमएस एच आर

५. साक्षी गुजर, एमएमएस एच आर

६. फातिमा अन्सारी, एमएमएस फायनान्स

४ जुलै २०२६ : डॉ. सुधाकर आगरकर यांच्या ७५व्या वाढदिवसा निमित्ताने त्यांचा सन्मान करण्यासाठी नॅशनल कम्युनिकेशन फॉर सेंटर ऑफ सायन्सतर्फे एका दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

७ जुलै २०२६ : टीजेएसबी (TJSB) च्या प्रशिक्षण केंद्रात डॉ. नीतिन जोशी यांनी त्यांच्या व्यवस्थापकांसाठी 'ग्राहकांना समजून घेणे' या विषयावर एक दिवसीय सत्र आयोजित केले.

१० जुलै २०२६ : डॉ. महेश भानुशाली यांनी २०२४–२६ तुकडीच्या खालील ७ विद्यार्थ्यांना सुप्रसिद्ध ब्रँड – VIVO मोबाईल्समध्ये मॅनेजमेंट ट्रेनी – मार्केटिंग या पदावर वार्षिक ५ लाख रुपयांच्या वेतनासह यशस्वीरित्या नियुक्ती सहकार्य केले.

१. चारमी देधिया, एमएमएस मार्केटिंग

२. मोहित भोसले, एमएमएस मार्केटिंग

३. सुजल करानिया, एमएमएस मार्केटिंग

४. आशिषकुमार गुप्ता, एमएमएस मार्केटिंग

५. उज्ज्वल राणा, एमएमएस मार्केटिंग

६. जेरोमिर पिंटो, एमएमएस मार्केटिंग

७. शुभम अग्रवाल, एमएमएस मार्केटिंग

२० जुलै २०२६ : डॉ. महेश भानुशाली यांना स्कोपस–अनुक्रमित नियतकालिक 'फ्रंटियर्स इन रिसर्च मेट्रिक्स अँड नालिटिक्स' मध्ये 'समीक्षक' म्हणून आमंत्रित करण्यात आले आणि त्यांनी नेवीगेटिंग बिब्लिओमॅट्रिक इंडिकेटर्स इन युनिव्हर्सिटी रँकिंग : कन्सेप्टच्युअल फ्रेमवर्क फॉर स्ट्रॅटेजिक रिसर्च मॅनेजमेंट या शीर्षकाच्या शोधनिबंधासाठी यशस्वीपणे समीक्षण सादर केले.

२४ जुलै २०२६ : डॉ. महेश भानुशाली यांना स्कोपस– अनुक्रमित नियतकालिक 'सप्लाय चेन मॅनेजमेंट: न इंटरनॅशनल जर्नल' मध्ये 'समीक्षक' म्हणून आमंत्रित करण्यात आले आणि त्यांनी 'जर्नल ऑफ पब्लिक प्रोक्योरमेंट' साठी अनपॅकिंग पब्लिक प्रोक्योरमेंट ट्रान्सपरन्सी थ्रू मेडिएटिंग अँड मॉडरेटिंग मेकॅनिझम्स या शीर्षकाच्या शोधनिबंधाचे समीक्षण यशस्वीरित्या सादर केले.

२५ जुलै २०२६ : रोजगार नियुक्ती (Placement Cell) विभागातर्फे, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट (NIPM) च्या सहकार्याने 'एआय (AI) च्या युगात – एच आर (HR) लीडरशिप' या विषयावर मानव संसाधन अधिकारी बैठक (HR-Meet) आणि कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. प्रतिष्ठित संस्थांमधील एचआर अधिकाऱ्यांसह ७५ हून अधिक उद्योग व्यावसायिकांनी यात हजेरी लावली. NIPM ने डॉ.व्ही.एन. बेडेकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या 'स्टुडंट चॅप्टर'ची घोषणा आणि उद्घाटनही केले. या सहसंबंधामुळे उद्योग–संस्था सहकार्य मजबूत होईल आणि विद्यार्थ्यांना उद्योग–क्षेत्रातील संधी मिळवण्याच्या दृष्टीने देखील फायदा होईल.



•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.